सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

## जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहर

## जिल्हा क्रीडा परिषद, मुंबई शहर



# मार्गदर्शिका

# २०१८-२०१९

शासकीय शालेय क्रीडा स्पर्धा, उपक्रम व शासकीय क्रीडा अनुदान योजना

महाराष्ट्र शासन

# शुभेच्छा संदेश



**शिवाजी जोंधळे**

**अध्यक्ष, जिल्हा क्रीडा परिषद,**

**मुंबई शहर**

सध्याच्या धावपळीच्या व धकाधकीच्या युगात खेळाद्वारे सदृढता हा मूलमंत्र सर्वांसाठी उपयुक्त ठरणारा आहे. त्याचमुळे सुदृढ शरीरात निरोगी मनाचा निवास असतो असे म्हटले जाते. महाराष्ट्र राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन प्रचार, प्रसार, जोपासना आणि प्रतिभावंत खेळाडू तयार व्हावेत यासाठी क्रीडा धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. युवकांची मोठी संख्या आहे, याचा विचार करून युवा वर्गाच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने युवा धोरण जाहीर करण्यात आले आहे. मुंबई शहर जिल्हयातही सायन - धारावी येथे आधुनिक सर्व सोई सुविधा असलेले क्रीडा संकुल उभारण्यात आले आहे. यामध्ये फुटबॉल, कबडी, खो-खो, जलतरण, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बॉक्सींग व इतर इनडोअर खेळांच्या सुविधा उपलब्ध आहेत. या सुविधांचा लाभ मुंबई शहर जिल्हयातील सर्वांनी घेतला तर चांगले खेळाडू निर्माण होण्यास मदत होईल.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि. ०२/०४/२००५ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांनी किमान दोन वैयक्तीक व एका सांघीक खेळामध्ये सहभागी होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने त्यांचा शारीरिक व्यायाम होण्याकरीता विद्यार्थ्यांनी खेळामध्ये सहभाग घेतला पाहिजे. जिल्हयातील सर्व शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, क्रीडा संघटना, क्रीडा मार्गदर्शक, क्रीडा शिक्षक तसेच क्रीडा कार्यकर्ते व खेळाडू यांनी सन २०१८-१९ या वर्षाच्या स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होउन स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करावे असे मी आपणास अवाहन करीत आहे.

जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांच्यामार्फत सन २०१८-१९ या वर्षातील शालेय, व इतर खेळांच्या क्रीडा स्पर्धांना शुभारंभ करताना व क्रीडा स्पर्धा आयोजनाची ही मार्गदर्शनपर पुस्तिका आपल्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. जिल्हयातील सर्व खेळाडू, शाळा, महाविद्यालये, क्रीडा संघटना, मार्गदर्शक, पंच, तांत्रिक अधिकारी, क्रीडा कार्यकर्ते व क्रीडा प्रेमी नागरीकांना माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा !

शिवाजी जोंधळे
जिल्हाधिकारी तथा
अध्यक्ष, जिल्हा क्रीडा परिषद, मुंबई शहर



# शुभेच्छा संदेश

महाराष्ट्र राज्यात शहरी भागापासून ग्रामस्तरापर्यंत घराघरात खेळाची आवड आणि संस्कृती रुजताना दिसत आहे. खेळामुळे विद्यार्थ्यांचा, नागरीकांचा विकास होतोच पण त्याचबरोबर शारीरिक व मानसिक वाढ होऊन सर्वांगिण विकास होऊन देशाकरीता चांगले नागरीक निर्माण होतात.

महाराष्ट्र राज्यात आज शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व पटवून देण्यात येत आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या विविध खेळाच्या क्रीडा सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करण्याकरीता विभागीय क्रीडा संकुल, जिल्हा क्रीडा संकुले, तालुका क्रीडा संकुले विकसित करण्यात येत असून त्या अद्ययावत करण्याच्या दृष्टीने त्यांच्या अनुदानांच्या रकमेत भरघोस वाढ करण्यात आली आहे. सन २०१०-११ पासून शालेय राष्ट्रीय स्पर्धा नैपुण्य व सहभाग क्रीडा शिष्यवृत्ती मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे. तसेच आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग व प्राविण्य मिळवणाऱ्या खेळाडूकरीता शिष्यवृत्ती लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच अतिउच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय सेवेत थेट वर्ग एक पदावर नियुक्ती देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

राज्याच्या युवा धोरणानुसार युवक व युवतींचा विकास करण्याकरीता अशी कामे करणाऱ्या व्यक्तींना व स्वयंसेवी संस्थांना जिल्हास्तरापासून राज्यस्तरापर्यंत पुरस्कार देण्यात येत आहेत. या मुळे अशा व्यक्ती व संस्थांचा उत्साह वाढून अधिक जोमाने ते या क्षेत्रात कार्य करुन राज्यातील युवा पिढीमध्ये नक्कीच सकारात्मक बदल होऊन त्यांचा सर्वांगीण विकास घडून येईल अशी मला खात्री आहे. शासनाच्या या योजनांमुळे जिल्ह्याची उज्वल क्रीडा व युवक विकास ही परंपरा पुढे नेण्यास याचा नक्कीच उपयोग होईल. येत्या काळात क्रीडा व युवक क्षेत्रात जिल्ह्यातील खेळाडू व युवक नवनवीन क्षितिजे गाठतील असा विश्वास आहे.

जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांच्या वतीने प्रकाशित करण्यात येत असलेल्या माहिती पुस्तिकेला व वार्षिक क्रीडा उपक्रमास माझ्या मन:पुर्वक शुभेच्छा !

**एन. बी. मोटे**
उपसंचालक,
क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई.

# मनोगत



शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालया अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहर जिल्ह्यामार्फत शासनाच्या क्रीडा विकासात्मक उपक्रमांची सर्वस्तरांवर अंमलबजावणी होत असून राज्य व राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात बॅडमिंटन, जलतरण, मैदानी स्पर्धा व जिम्नॅस्टिक्स या खेळांमध्ये मुंबई शहर जिल्ह्यातील खेळाडूंची संख्या ही राज्यात सर्वाधिक आहे.

क्रीडा विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांच्या माध्यमातून मुंबई शहर जिल्ह्यातील प्रत्येक वॉर्डात व्यायामशाळा सुरु करणे, क्रीडांगणांचा विकास करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. याशिवाय युवकांसाठीही युवक कल्याण विषयक योजनांच्या माध्यमातून व्यवसाय मार्गदर्शन शिबीर, आरोग्यसेवा, समाजसेवा शिबीर या उपक्रमांचे आयोजन नोंदणीकृत संस्थांच्या मार्फत केले जात असते. महाराष्ट्र शासनामार्फत खेळाडूंना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ केली आहे. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उच्चतम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना रोख पारितोषीक ही देण्यात येत आहेत.

सन २०१८-२०१९ मध्ये आयोजित होणाऱ्या शालेय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाबाबतची माहिती, स्पर्धांचे वेळापत्रक, क्रीडा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रम यांची माहिती असणारी मार्गदर्शनपर पुस्तिका आपणांस देताना मला अत्यंत आनंद होत आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील सर्व शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, क्रीडा संघटना, क्रीडा मार्गदर्शक, क्रीडा कार्यकर्ते, खेळाडू यांनी या स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन या शालेय स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करावे असे मी आपणांस आवाहन करीत आहे.

मागील वर्षी आपण सर्वांनी या स्पर्धांमध्ये सहभागी होऊन या शालेय स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले आहे, या बद्दल जिल्हा क्रीडा परिषद, मुंबई शहराच्या वतीने मी आपणांस धन्यवाद देते.

आपण सर्वांना सन २०१८-२०१९ वर्षाच्या सर्व क्रीडा स्पर्धा व उपक्रमांसाठी हार्दीक शुभेच्छा !


**अभय चव्हाण**
जिल्हा क्रीडा अधिकारी,
तथा सदस्य सचिव,
जिल्हा क्रीडा परिषद, मुंबई शहर.

जा.क्र.जिक्रीअ/जि.क्री.प../क्रीस्पाआ/२०१७
जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,
२ रा मजला, जिल्हा क्रीडा संकुल इमारत,
सायन वांद्रे लिंक रोड, धारावी-सायन (प).
मुंबई – १७.
दि. २०/०७/२०१८

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
जि. मुंबई शहर.

विषय :- क्रीडा स्पर्धा आयोजन –२०१८ -२०१९
संदर्भ :- शासन निर्णय क्र. राक्रीधो / २००५ / प्र.क्र.१५ / क्रीयुसे-दि.०२/०४/२००५

उपरोक्त विषयान्वये व संदर्भिय शासन निर्णयान्वये कळविण्यात येते की, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे विद्यमाने जिल्हा क्रीदा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांचे वतीने मुंबई शहर जिल्ह्यातील सन २०१८ -२०१९ या शैक्षणिक वर्षात आयोजित करण्यात येणाऱ्या शालेय व इतर स्पर्धांची माहिती सोबत पाठविण्यात येत आहे. सदर माहितीचे आपण व्यक्तिश: अवलोकन करुन विविध खेळांच्या क्रीडा स्पर्धेत आपल्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालय / क्रीडा संघटनेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग होण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करावेत.

संदर्भिय शासन निर्णयानुसार स्पर्धांमध्ये सहभागी न झाल्यास होणारी पुढील कार्यवाही टाळण्याच्या दृष्टीने किमान दोन सांघीक व तीन वैयक्तीक, आणि किमान दोन स्वतंत्र वयोगटात स्पर्धेत भाग घ्यावा. विहित मुदतीमध्ये सविस्तर प्रवेशिका सादर करण्याची दक्षता घ्यावी.

स्पर्धेपूर्वी आणि स्पर्धा कालावधीत आपल्या शाळेतील शारीरिक शिक्षण शिक्षक / शिक्षकांना स्पर्धेच्या कामाकरिता कार्यमुक्त करुन त्यांची सेवा व आपल्या अधिपत्याखाली क्रीडांगण व क्रीडा विषयक सुविधा आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देऊन विविध क्रीडा स्पर्धा व उपक्रम यशस्वी पार पाडण्याकरीता सहकार्य करावे ही विनंती.

**अभय चव्हाण**
जिल्हा क्रीडा अधिकारी
मुंबई शहर

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
२. मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा क्रीडा परिषद, मुंबई शहर
३. मा. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई
४. मा. जिल्हा क्रीडा अधिकारी, (सर्व) महाराष्ट्र राज्य.
५. मा. सदस्य, जिल्हा क्रीडा परिषद, मुंबई शहर
६. अध्यक्ष, एकविध जिल्हा संघटना, मुंबई शहर
७. पोलीस विभाग
८. आरोग्य विभाग
९. मनपा विभाग
१०.शालेय शिक्षण विभाग


कॅरम खेळाच्या विकासासाठी
हार्दिक शुभेच्छा!
MUMBAI DISTRICT CARROM ASSOCIATION
मुंबई डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशन
संलग्न : महाराष्ट्र कॅरम असोसिएशन
सोसायटी रजि. क्र. ३४० - १९९१ - जी.बी.बी.एस.डी. मुंबई
रजि. क्रमांक - एफ १४७४७ मुंबई • पॅन अेअेअेटीएम ४३८९ सी
पत्ता : अरुण केदार, ३८/९७५, आदर्श नगर, प्रभादेवी,
मुंबई - ४०० ०३०. भ्रमणध्वनी : ८०८० ४३३५४४
प्रदिप मयेकर
अध्यक्ष
यतिन ठाकूर
मानद सरचिटणीस
संजय देसाई
मानद खजिनदार

# माहिती पुस्तीका अनुक्रमणिका

| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | खेळाडूंच्या वयोगटाचा तक्ता.......................................................................... | १ |
| २. | शालेय क्रीडा स्पर्धांसाठी खेळ वयोगट व खेळाडू संख्या दर्शविणारा तक्ता................ | २-५ |
| ३. | कबड्डी खेळाचे मैदान व वजन गट आणि मैदानी स्पर्धा वजन व आकारमान............ | ५ |
| ४. | खेळाडू व वजन गट व बाब दर्शविणारा तक्ता ................................................. | ६ ते ९ |
| ५. | मैदानी स्पर्धा खेळाच्या बाबी........................................................................ | १० |
| ६. | जलतरण बाबीचा तक्ता.................................................................................. | ११ |
| ७. | कार्यालयाची माहीती ...................................................................................... | १२ |
| ८. | नोंदणी शुल्क, प्रवेश फी, स्पर्धा आयोजनाचे नियम ............................................ | १३ ते १५ |
| ९. | योगासने विषयक नियम व अटी ...................................................................... | १६ |
| १०. | खेळाडूचे पात्रता प्रमाण पत्र ............................................................................ | १७ ते १८ |
| ११. | प्रवेश अर्जाचे नमुने ......................................................................................... | १९ ते २२ |
| १२. | राज्य / केंद्र शासन विविध योजना ...................................................................... | २२ |
| १३. | युवा महोत्सव पत्र ............................................................................................ | २३ |
| १४. | क्रीडा दिन – क्रीडा सप्ताह ................................................................................ | २४ |
| १५. | राष्ट्रीय युवा – दिन सप्ताह ............................................................................... | २५ |
| १६. | शाळा व महाविद्यालयांसाठी अनुदान योजना .................................................... | २६ |
| १७. | सवलतीचे गुण ( ग्रेस मार्क्स ) शासन निर्णय ..................................................... | २७ ते ३० |
| १८. | खेळाडूंना नोकरी आरक्षण शासन निर्णय ......................................................... | ३१ |
| १९. | क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य अनुदान शासन निर्णय ....................... | ३२ ते ३५ |
| २०. | जिल्हा क्रीडा पुरस्कार ...................................................................................... | ३६ |
| २१. | वैयक्तिक खेळ प्राथमिक प्रवेश अर्ज ................................................................. | ३७ |
| २२. | सांघिक खेळ प्राथमिक प्रवेश अर्ज .................................................................... | ३८ |

# खेळाडूंच्या वयोगटाचा तक्ता

| अ.क्र. | क्रीडा स्पर्धा | वयोगट | इयत्ता | खेळाडूंचा जन्म |
|---|---|---|---|---|
| १. | शालेय क्रीडा स्पर्धा | १९ वर्षाआतील | इयत्ता ६ वी ते १२ पर्यंत शिकत असलेले | १-१-२००० अथवा त्यानंतरचा |
| २. | शालेय क्रीडा स्पर्धा | १७ वर्षाआतील | इयत्ता ६ वी ते १० पर्यंत शिकत असलेले | १-१-२००२ अथवा त्यानंतरचा |
| ३. | शालेय क्रीडा स्पर्धा | १४ वर्षाआतील | इयत्ता ६ वी ते पर्यंत शिकत | १-१-२००५ अथवा त्यानंतरचा |
| ४. | सुब्रोतो मुखर्जी | १४ वर्षाआतील मुले | कोणत्याही वर्गात शिकत असलेले | ०१-०१-२००५ नंतरचा |
| ५. | सुब्रोतो मुखर्जी | १७ वर्षाआतील मुले मुली | कोणत्याही वर्गात शिकत असलेले | ०१-०१-२००२ अथवा त्यानंतरचा |
| ६. | ज्युनियर नेहरु कप हॉकी | १७ वर्षाआतील | कोणत्याही वर्गात शिकत असलेले | १-११-२००१ अथवा त्यानंतरचा |
| ७. | सब ज्युनियर नेहरु कप हॉकी | १५ वर्षाआतील | कोणत्याही वर्गात शिकत असलेले | १-११-२००३ अथवा त्यानंतरचा |
| ८. | स्केटींग | ११ वर्षाआतील | ३ री ते ५ पर्यंत शिकत असलेले | १-१-२००८ अथवा त्यानंतरचा |

टीप :

१ सर्व खेळांच्या स्पर्धेकरीता खेळाडूंचे वयोगट दि.३१ डिसेंबर २०१८ रोजी निश्चित करण्यात यावेत( सुब्रोतो कप फुटबॉल / नेहरू कप हॉकी स्पर्धा सोडून )

२ ज्युनियर व सब ज्युनियर नेहरु कप हॉकी स्पर्धेकरीता खेळाडूंचे वयोगट दि. १ नोव्हेंबर २०१८ रोजी निश्चित करण्यात यावेत

## संस्था / शाळा / संघ / खेळाडू विरुध्द दंडात्मक कार्यवाही

नियम-१-अ)विविध स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धेमध्ये खोटी जन्मतारीख नमूद करुन खालच्या वयोगटात स्पर्धाकांना खेळविणे.

ब) खोटे पात्रता प्रमाणपत्र, रहिवासी दाखला इ.

क) दुसऱ्या खेळाडूंच्या नावावर अन्य खेळाडू खेळविणे.

ड) शाळ, कनिष्ठ महाविद्यालय, संस्थेबाहेरील खेळाडू खेळविणे.

ई) स्पर्धा आयोजनामध्ये व्यत्यय आणणे, गोंधळ घालणे, अंगावर धावून जाणे इ.

उपरोक्त बाबीमध्ये फसवणूक करणाऱ्या व दंगा करणाऱ्या संघ / खेळाडूंना स्पर्धेमधून बाद ठरविण्यात येईल तसेच प्राथमिक चौकशीमध्ये फसवणूक केल्याचे सिध्द झाल्यास संबधित शाळा / महाविद्यालयाचे मुख्याध्यापक / प्राचार्य / क्रीडा शिक्षक यांचे विरुध्द भारतीय दंड संहितेनुसार फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्यात येईल, किंवा शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या प्रचलित दंड संहितेनुसार पात्र ठरणारी शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

# क्रीडा स्पर्धा वयोगटनिहाय खेळ प्रकार

## परिशिष्ट – १

## शालेय क्रीडा स्पर्धा खेळ, वयोगटनिहाय खेळ प्रकार २०१८–२०१९

| क्रीडा स्पर्धा कार्यक्रम – २०१८–२०१९ | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | खेळ | वयोगट | प्रत्येक संघातील खेळाडू संख्या |
| १ | आर्चरी १)इंडियन राऊंड २)फीटा राऊंड | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | ०४ + ०४ |
| २. | ॲथलेटिक्स | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | बाब निहाय २ खेळाडू |
| | क्रॉसकंट्री | १९ वर्षाखालील मुले / मुली | ६ |
| ३. | बॅडमिंटन | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | ५ |
| ४. | बास्केटबॉल | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | १२ |
| ५. | बॉक्सिंग | १४ वर्षाखालील मुले, व १७,१९ वर्षा खालील मुले/मुली | प्रत्येक वजनीगटात २ खेळाडू |
| ६. | बेसबॉल | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | १६ |
| ७. | बॉल बॅडमिंटन | १९ वर्षाखालील मुले / मुली | ८ |
| ८. | बुध्दीबळ | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | ५ |
| ९. | क्रिकेट | १४ वर्षाखालील मुले, व १७,१९ वर्षा खालील मुले/मुली | १६ |
| १०. | सायकलिग रोड रेस | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | ६ |
| ११. | शुटींगबॉल | १९ वर्षाखालील मुले / मुली | १० |
| १२. | स्क्वॅश | १४, १७ व १९ वर्षाखालील मुले/मुली | ४ |
| १३. | कॅरम | १४, १७ व १९ वर्षाखालील मुले/मुली | ६ |
| १४. | डॉज बॉल | १९ वर्षाखालील मुले / मुली | १० |
| १५. | फुट्‌बॉल | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | १८ |
| १६. | तलवारबाजी | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | बाबनिहाय मुले / मुली ३ + ३ |
| १७. | जिम्नॅस्टिक्स आर्टिस्टीक | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | ७ मुले ६ मुली |
| | रिदमिक जिम्नॅस्टीक्स | १४,१७,१९ वर्षाखालील मुली | प्रत्येक वयोगटात ३ खेळाडू |
| | ॲक्रोबॅटिक्स | १९ वर्षाखालील मुले | ७ |
| १८. | हॉकी शालेय | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | १८ |

**टीप : क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या परिपत्रकान्वये नव्याने समावेश होणाऱ्या खेळांच्या स्पर्धांचे आयोजन दिलेल्या सूचनांप्रमाणे करण्यात येईल.**

# क्रीडा स्पर्धा कार्यक्रम – २०१८ – २०१९

| | | | |
|---|---|---|---|
| १९. | हॅन्डबॉल | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | १६ |
| २०. | ज्युदो | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | प्रत्येक वजनीगटात २ खेळाडू |
| २१. | कबड्डी | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | १२ |
| २२. | खो – खो | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | १२ |
| २३. | किकबॉक्सिंग | १४, १७ व १९ वर्षाखालील मुले/मुली | प्रत्येक वजनीगटात २ खेळाडू |
| २४. | लॉनटेनिस | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | ५ |
| २५. | मल्लखांब / रोप मल्लखांब | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | ४ |
| २६. | नेटबॉल | १७,१९ वर्षाखालील मुले / मुली | १२ |
| २७. | नेहरु कप हॉकी | १५,१७ वर्षाखालील मुले व १७ मुली | १६ |
| २८. | रोलर स्केटीं (क्वॉड व इनलाईन) | ११,१४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | क्वाड व इनलाईन प्रत्येकी ३ |
| | रोलर हॉकी | १९ वर्षाखालील मुले | १२ |
| २९. | रोल बॉल | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | १२ |
| ३०. | रायफल शुटींग | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | ४ |
| ३१. | जलतरण व डायव्हिंग | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | बाब निहाय २ खेळाडू |
| | वॉपटरपोलो | १९ वर्षाखालील मुले / मुली | १३ |
| ३२. | सॉफ्टबॉल | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | १६ |
| ३३. | सिकई मार्शल आर्ट | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | प्रत्येक वजनीगटात २ खेळाडू |
| ३४. | सुब्रतो कप फुटबॉल | १४ व १७ वर्षाखालील मुले / १७ वर्षे मुली | १६ |
| ३५. | टेबल टेनिस | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | ५ |
| ३६. | तायक्वॉंदो | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | प्रत्येक वजनीगटात २ खेळाडू |
| ३७. | थ्रोबॉल | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | १२ |
| ३८. | व्हॉलीबॉल | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | १२ |
| ३९. | कुस्ती फ्री स्टाईल | १४ वर्षाखालील मुले, व १७,१९ वर्षा खालील मुले/मुली | प्रत्येक वजनीगटात २ खेळाडू |
| | कुस्ती ग्रीको रोमन | १४,१७,१९ वर्षाखालील मुले | प्रत्येक वजनीगटात २ खेळाडू |

**टीप : क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या परिपत्रकान्वये नव्याने समावेश होणाऱ्या खेळांच्या स्पर्धांचे आयोजन दिलेल्या सूचनांप्रमाणे करण्यात येईल.**

# क्रीडा स्पर्धा कार्यक्रम – २०१८–२०१९

| | | | |
|---|---|---|---|
| ४०. | वेटलिफ्टींग | १७,१९ वर्षाखालील मुले / मुली | प्रत्येक वजनीगटात २ खेळाडू |
| ४१. | योगा | १४,१७,१९ वर्षाखालील मुले / मुली | ७ |
| ४२. | कराटे | १४, १७ व १९ वर्षाखालील मुले/मुली | प्रत्येक वजनीगटात २ खेळाडू |
| ४३ | वुशू | १७,१९ वर्षाखालील मुले / मुली | प्रत्येक वजनीगटात २ खेळाडू |
| ४४. | सेपाक टकरा | १९ वर्षाखालील मुले | ५ |
| ४५. | सॉफ्टटेनिस | १७ व १९ वर्षाखालील मुले/मुली | ६ |
| ४६. | रग्बी | १७व १९ वर्षाखालील मुले/मुली | |
| ४७. | मॉर्डन पॅन्टॅथलॉज | १९ वर्षाखालील मुले/मुली | |
| ४८. | टेनिक्वाईट | १९ वर्षाखालील मुले/मुली | ६ |

**टीप : क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या परिपत्रकान्वये नव्याने समावेश होणाऱ्या खेळांच्या स्पर्धांचे आयोजन दिलेल्या सूचनांप्रमाणे करण्यात येईल.**

# कबड्डी मैदानाची व वजनाची माहिती

| अ.क्र. | वयोगट | मैदानचे माप | वजन कि. ग्रॅम | खेळाडू संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | १४ वर्षे मुले | ११ × ८ मी. | ५१ किलोखालील | १२ |
| २. | १४ वर्षे मुली | ११ × ८ मी. | ४८ किलोखालील | १२ |
| ३. | १७ वर्षे मुले | १२× ८ मी. | ५७ किलोखालील | १२ |
| ४. | १७ वर्षे मुली | १२× ८ मी. | ५३ किलोखालील | १२ |
| ५. | १९ वर्षे मुले | १३ × १० मी. | ६५ किलोखालील | १२ |
| ६. | १९ वर्षे मुली | १२ × ८ मी. | ५९ किलोखालील | १२ |

# मैदानी खेळ वजन व आकारमान

| | १४ वर्षे मुले | १७ वर्षे मुले | १९ वर्षे मुले | १४ वर्षे मुली | १७ वर्षे मुली | १९ वर्षे मुली |
|---|---|---|---|---|---|---|
| ८० मी. हर्डल्स | ७६.२ से.मी. | - | - | ७६.२ कि.ग्रॅ. | - | - |
| १०० मी. हर्डल्स | - | ९१.४ से.मी. | - | - | ७६.२ से.मी. | ८४ से.मी. |
| ११० मी. हर्डल्स | - | - | ९९.० से.मी. | - | - | - |
| ४०० मी. हर्डल्स | - | - | ९१.४ से.मी. | - | - | ७६.२ से.मी. |
| गोळा फेक | ४ कि.ग्रॅ. | ५ कि.ग्रॅ. | ६.० कि.ग्रॅ. | ४ कि.ग्रॅ. | ४ कि.ग्रॅ. | ४ कि.ग्रॅ. |
| थाळी फेक | १ कि.ग्रॅ. | १.५ कि.ग्रॅ. | १.७५ कि.ग्रॅ. | १ कि.ग्रॅ. | १ कि.ग्रॅ. | १ कि.ग्रॅ. |
| हातोडा फेक | - | ५ कि.ग्रॅ. | ६ कि.ग्रॅ. | - | ४ कि.ग्रॅ. | ४ कि.ग्रॅ. |
| भाला फेक | - | ७०० ग्रॅम्स | ८०० ग्रॅम्स | - | ६०० ग्रॅम्स | ६०० ग्रॅम्स |

**टीप :-** शालेय क्रीडा स्पर्धांसाठी खेळ, वयोगट व खेळाडू संख्या दर्शविणाऱ्या तक्त्यातील अनुक्रमांक ४४ ते ४८ वर नमूद केलेल्या खेळांच्या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा आयोजनाबाबत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर आयोजनाबाबत कार्यवाही करण्यात येईल, तथापि ज्या शाळा / कनिष्ठ महाविद्यायांना आपल्या खेळाडूंना सहभागी करावयाचे असेल त्यांनी प्राथमिक प्रवेशिकेत (Y) अशी टीक करावी. मात्र प्रवेश फी भरू नये. प्रवेश फी व इतर माहिती स्वतंत्र देण्यात येईल. प्राथमिक प्रवेशिकेत नोंद करण्यात आलेल्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांच स्पर्धा आयोजनाबाबतचा कार्यक्रम कळविण्यात येईल, यांची कृपया नोंद घ्यावी.

# शालेय क्रीडा स्पर्धेतील विविध खेळनिहाय व वयोगटनिहाय वजनगट

विविध स्तरनियाह आयोजित करण्यात येणाऱ्या क्रीडा स्पर्धेसाठी विविध खेळनिहाय व वयोगटनिहाय वजनगट पारिशिष्ट ३ नुसार राहतील. तथापी वेळोवेळी भारतीय शालेय खेळ महासंघाने केलेल्या बदलाच्या अंतर्भाव संचलनालयामार्फत करण्यात येईल.

## ज्युदो (वजन गट)

| १४ वर्षाखालील | | १७ वर्षाखालील | | १९ वर्षाखालील | |
|---|---|---|---|---|---|
| मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| २५ किलो खालील | २३ किलो खालील | ४० किलो खालील | ३६ किलो खालील | ४० किलो खालील | ३६ किलो खालील |
| ३० किलो खालील | २७ किलो खालील | ४५ किलो खालील | ४० किलो खालील | ४५ किलो खालील | ४० किलो खालील |
| ३५ किलो खालील | ३२ किलो खालील | ५० किलो खालील | ४४ किलो खालील | ५० किलो खालील | ४४ किलो खालील |
| ४० किलो खालील | ३६ किलो खालील | ५५ किलो खालील | ४८ किलो खालील | ५५ किलो खालील | ४८ किलो खालील |
| ४५ किलो खालील | ४० किलो खालील | ६० किलो खालील | ५२ किलो खालील | ६० किलो खालील | ५२ किलो खालील |
| ५० किलो खालील | ४४ किलो खालील | ६६ कलो खालील | ५७ किलो खालील | ६६ कलो खालील | ५७ किलो खालील |
| ५० किलो वरील | ४४ किलो वरील | ७३ किलो खालील | ६३ किलो खालील | ७३ किलो खालील | ६३ किलो खालील |
| | | ८१ किलो खालील | ७० किलो खालील | ८१ किलो खालील | ७० किलो खालील |
| | | ९० किलो खालील | ७० किलो वरील | ९० किलो खालील | ७० किलो वरील |
| | | ९० किलो वरील | | ९० किलो वरील | |

## कुस्ती (वजन गट) फ्रीस्टाईल व ग्रीकोरोमन

| १४ वर्षाखालील | १४ वर्षाखालील | १७ वर्षाखालील | १७ वर्षाखालील | १९ वर्षाखालील | १९ वर्षाखालील |
|---|---|---|---|---|---|
| मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| ३२ कि. खालील | ३२ कि. खालील | ४२ कि. खालील | ३८ कि. खालील | ४२ कि. खालील | ४४ कि. खालील |
| ३५ कि. खालील | ३५ कि. खालील | ४६ कि. खालील | ४० कि. खालील | ४६ कि. खालील | ४८ कि. खालील |
| ३८ कि. खालील | ३८ कि. खालील | ५० कि. खालील | ४३ कि. खालील | ५० कि. खालील | ५१ कि. खालील |
| ४१ कि. खालील | ४१ कि. खालील | ५४ कि. खालील | ४६ कि. खालील | ५५ कि. खालील | ५५ कि. खालील |
| ४५ कि. खालील | ४४ कि. खालील | ५८ कि. खालील | ४९ कि. खालील | ६० कि. खालील | ५९ कि. खालील |
| ४९ कि. खालील | ४८ कि. खालील | ६३ कि. खालील | ५२ कि. खालील | ६६ कि. खालील | ६३ कि. खालील |
| ५५ कि. खालील | ५२ कि. खालील | ६९ कि. खालील | ५६ कि. खालील | ७४ कि. खालील | ६७ कि. खालील |
| ६० कि. खालील | | ७६ कि. खालील | ६० कि. खालील | ८४ कि. खालील | ७२ कि. खालील |
| | | ८५ कि. खालील | ६५ कि. खालील | ९६ कि. खालील | |
| | | १०० कि. खालील | ७० कि. खालील | १२० कि. खालील | |

## वेटलिफ्टींग (वजन गट)

| १७ वर्षाखालील | १७ वर्षाखालील | १९ वर्षाखालील | १९ वर्षाखालील |
|---|---|---|---|
| मुले | मुली | मुले | मुली |
| ५० कि. खालील | ४४ कि. खालील | ५० कि. खालील | ४४ कि. खालील |
| ५६ कि. खालील | ४८ कि. खालील | ५६ कि. खालील | ४८ कि. खालील |
| ६२ कि. खालील | ५३ कि. खालील | ६२ कि. खालील | ५३ कि. खालील |
| ६९ कि. खालील | ५८ कि. खालील | ६९ कि. खालील | ५८ कि. खालील |
| ७७ कि. खालील | ६३ कि. खालील | ७७ कि. खालील | ६३ कि. खालील |
| ८५ कि. खालील | ६९ कि. खालील | ८५ कि. खालील | ६९ कि. खालील |
| ९४ कि. खालील | ७५ कि. खालील | ९४ कि. खालील | ७५ कि. खालील |
| ९४ कि. वरील | ७५ कि. वरील | १०५ कि. खालील | ७५ कि. वरील |
| | | १०५ कि. वरील | |

## तायक्वाँदो (वजन गट)

| | |
|---|---|
| १) १४ वर्षे मुले | १८ किलोखालील १८ ते २१, कि. २१ ते २३, कि. २३ ते २५, कि. २५ ते २७, कि. २७ ते २९, कि. २९ ते ३२, कि. ३२ ते ३५, कि. ३५ ते ३८, कि. ३८ ते ४१, कि. ४१ किलोवरील |
| मुली | १६ किलोखालील, १६ ते १८, कि. १८ ते २०, कि. २० ते २२, कि. २२ ते २४, कि. २४ ते २६, कि. २६ ते २९, कि. २९ ते ३२, कि. ३२ ते ३५, कि. ३५ ते ३८, कि. ३८ किलोवरील. |
| २) १७ वर्षे मुले | ३५ किलोखालील, ३५ ते ३८, कि. ३८ ते ४१, कि. ४१ ते ४५, कि. ४५ ते ४८, कि. ४८ ते ५१, कि. ५१ ते ५५, कि. ५५ ते ५९, कि. ५९ ते ६३, कि. ६३ ते ६८, कि. ६८ ते ७३, कि. ७३ ते ७८, ७८ किलो वरील |
| मुली | ३२ किलोखालील, ३२ ते ३५, कि. ३५ ते ३८, कि. ३८ ते ४२, कि. ४२ ते ४४, कि. ४४ ते ४६, कि. ४६ ते ४९, कि. ४९ ते ५२, कि. ५२ ते ५५, कि. ५५ ते ५९, कि. ५९ ते ६३, कि. ६३ ते ६८, ६८ किलो वरील |
| ३) १९ वर्षे मुले | ४५ किलोखालील, ४५ ते ४८, कि. ४८ ते ५१, कि. ५१ ते ५५, कि. ५५ ते ५९, कि. ५९ ते ६३, कि. ६३ ते ६८, कि. ६८ ते ७३, कि. ७३ ते ७८, ७८ किलोवरील |
| मुली | ४० किलोखालील, ४० ते ४२, कि. ४२ ते ४४, कि. ४४ ते ४६, कि. ४६ ते ४९, कि. ४९ ते ५२, कि. ५२ ते ५५, कि. ५५ ते ५९, कि. ५९ ते ६३, कि. ६३ ते ६८, ६८ किलोवरील |

# बॉक्सिंग वजन गट

| १४ वर्षाआतील मुले | १७ वर्षाआतील मुले / मुली | | १९ वर्षाआतील मुले / मुली | |
|---|---|---|---|---|
| | ४६ किलो खालील | ४२ किलो खालील | ४६ किलो खालील | ४५ किलो खालील |
| २८ ते ३० | ४६ ते ४८ | ४२ ते ४४ | ४६ ते ४९ | ४५ ते ४८ |
| ३० ते ३२ | ४८ ते ५० | ४४ ते ४६ | ४९ ते ५२ | ४८ ते ५१ |
| ३२ ते ३४ | ५० ते ५२ | ४६ ते ४८ | ५२ ते ५६ | ५१ ते ५४ |
| ३४ ते ३६ | ५२ ते ५४ | ४८ ते ५० | ५६ ते ६० | ५४ ते ५७ |
| ३६ ते ३८ | ५४ ते ५७ | ५० ते ५२ | ६० ते ६४ | ५७ ते ६० |
| ३८ ते ४० | ५७ ते ६० | ५२ ते ५४ | ६४ ते ६९ | ६० ते ६४ |
| ४० ते ४२ | ६० ते ६३ | ५४ ते ५७ | ६९ ते ७५ | ६४ ते ६६ |
| ४२ ते ४४ | ६३ ते ६६ | ५७ ते ६० | ७५ ते ८१ | ६६ ते ६९ |
| ४४ ते ४६ | ६६ ते ७० | ६० ते ६३ | ८१ ते ९१ | ६९ ते ७५ |
| ४६ ते ४८ | ७० ते ७५ | ६३ ते ६६ | ९१ किलो वरील | ७५ ते ८१ |
| ४८ ते ५० | ७५ ते ८० | ६६ ते ७० | | ८१ वरील |
| | ८० वरील | ७० ते ७५ | | |
| | | ७५ ते ८० | | |
| | | ८० वरील | | |

# किक बॉक्सिंग

| वयोगट | वजनगट | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ वर्षे मुले | −२४ किग्रॅ | −२८ किग्रॅ | −३२ किग्रॅ | −४२ किग्रॅ | −४७ किग्रॅ | −५२ किग्रॅ | −५७ किग्रॅ | −६३ किग्रॅ | +६३ किग्रॅ | |
| १४ वर्षे मुली | −२४ किग्रॅ | −२८ किग्रॅ | −३२ किग्रॅ | −३७ किग्रॅ | −४२ किग्रॅ | −४६ किग्रॅ | −५० किग्रॅ | +५० किग्रॅ | | |
| १७ वर्षे मुले | −३५ किग्रॅ | −४० किग्रॅ | −४५ किग्रॅ | −५० किग्रॅ | −५५ किग्रॅ | −६० किग्रॅ | −६५ किग्रॅ | −७० किग्रॅ | −७५ किग्रॅ | +७५ किग्रॅ |
| १७ वर्षे मुली | −३५ किग्रॅ | −४० किग्रॅ | −४५ किग्रॅ | −५० किग्रॅ | −५५ किग्रॅ | −६० किग्रॅ | +६० किग्रॅ | | | |
| १९ वर्षे मुले | −४४ किग्रॅ | −४८ किग्रॅ | −५२ किग्रॅ | −५६ किग्रॅ | −६० किग्रॅ | −६५ किग्रॅ | −७० किग्रॅ | −७५ किग्रॅ | −८० किग्रॅ | +८० किग्रॅ |
| १९ वर्षे मुली | −४५ किग्रॅ | −४८ किग्रॅ | −५१ किग्रॅ | −५४ किग्रॅ | −५७ किग्रॅ | −६३ किग्रॅ | +६३ किग्रॅ | | | |

# कबड्डीवजन गट व क्रीडांगण मापे

| वयोगट | क्रीडांगण क्षेत्रफळ | वजन गट |
|---|---|---|
| १४ वर्षा खालील मुले | ११ x ८ मी | ५१ किलो खालील |
| १४ वर्षा खालील मुली | ११ x ८ मी | ४८ किलो खालील |
| १७ वर्षा खालील मुले | १२ x ८ मी | ५७ किलो खालील |
| १७ वर्षा खालील मुली | १२ x ८ मी | ५३ किलो खालील |
| १९ वर्षा खालील मुले | १३ x १० मी | ६५ किलो खालील |
| १९ वर्षा खालील मुली | १२ x ८ मी | ५९ किलो खालील |

## वुशू (वजन गट)

| | |
|---|---|
| २) १७ वर्षे मुले | ४०कि., ४५कि., ४८कि., ५२कि., ५६कि., ६०कि., ६५कि., ७०कि., ७५ कि., |
| मुली | ३६कि., ४०कि., ४५कि., ४८कि., ५२कि., ५६कि., ६०कि., ६५कि., ७०कि. |
| ३) १९ वर्षे मुले | ४४कि., ४८कि., ५२कि., ५६कि., ६०कि., ६५कि., ७०कि., ७५कि., ७५कि.,८०कि., ८५ कि., ८५ कि.वरील |
| मुली | ४०कि., ४४कि., ४८कि., ५२कि., ५६कि., ६०कि., ६५कि., ६५कि., ७०कि., ७०कि.वरील |

## कराटे (वजन गट)

| | |
|---|---|
| १) १४ वर्षे मुले | २०कि.,२०-२५कि.,२५-३०कि.,३०-३५कि.,३५-४०कि.,४०-४५कि.,४५-५०कि.,५०-५५कि.,५५-६०कि.,६०कि. वरील |
| मुली | १८कि.,१८-२२कि.,२२-२४ कि., २४-२६कि.,२६-३०कि.,३०-३४कि.,३४-३८कि.,३८-४२कि.,४२-४६कि.,४६-५०कि.,५०कि. वरील |
| २) १७ वर्षे मुले | ३५कि.,३५-४०कि.,४०-४५कि., ४५-५०कि.,५०-५५कि.,५५-६०कि., ६०-६५कि.,६५-७०कि.,७०कि. वरील |
| मुली | ३२कि.,३२-३६कि.,३६-४०कि.,४०-४४कि.,४४-४८कि.,४८-५२कि.,५२-५६कि.,५६-६०कि.,६०कि. वरील |
| ३) १९ वर्षे मुले | ४५कि.,४५-५०कि.,५०-५५कि.,५५-६०कि.,६०-६५कि.,६५-७०कि.,७०कि. वरील |
| मुली | ४०कि.,४०-४४कि.,४४-४८कि.,४८-५२कि.,५२-५६कि.,५६-६०कि.,६० कि. वरील |

## सिकई मार्शल आर्ट (वजन गट)

| | |
|---|---|
| १) १४ वर्षे मुले | -२५कि., २५-२९ कि., २९-३३ कि., ३३-३७ कि., ३७-४१कि., ४१-४५ कि., ४५कि. वरील |
| मुली | -२३ कि., २३-२७ कि., २७-३१ कि., ३१-३५ कि., ३५-३९ कि., ३९-४१ कि., ४१ कि. वरील |
| २) १७ वर्षे मुले | -४० कि., ४०-४४ कि., ४४-४८ कि., ४८-५२ कि., ५२-५६ कि., ५६-६० कि., ६० कि. वरील |
| मुली | -३६ कि., ३६-४० कि., ४०-४४ कि., ४४-४८ कि., ४८-५२ कि., ५२-५६ कि., ५६ कि. वरील |
| ३) १९ वर्षे मुले | -४६ कि., ४६-५० कि., ५०-५४ कि., ५४-५८ कि., ५८-६२ कि., ६२-६६ कि., ६६ कि. वरील |
| मुली | -४२ कि., ४२-४६ कि., ४६-५० कि., ५०-५४ कि., ५४-५८ कि., ५८-६२ कि., ६२ कि. वरील |

# * जलतरण स्पर्धेतील स्पर्धा बाबींचा तक्ता *

| वयोगट | मुले | मुली |
|---|---|---|
| १९ वर्षाआतील | फ्रीस्टाईल : ५०,१००,२००,४०० व १५०० मी.<br>बॅक स्ट्रोक : ५०,१००,५०० मी.<br>बेस्टस्ट्रोक : ५०,१००,२०० मी.<br>बटरफ्लाय : ५०,१००,२०० मी.<br>वैयक्तिक मिडले : २००,४०० मी.<br>रिले : ४ x१०० मी. फ्रीस्टाईल व<br>४ x१०० मिडले ४ x१०० मिडले<br>डायव्हींग : १ व ३ मी. स्प्रिंगबोर्ड,<br>हायबोर्ड | फ्रीस्टाईल : ५०,१००,२००,४०० व ८०० मी.<br>बॅक स्ट्रोक : ५०,१००,२०० मी.<br>बेस्टस्ट्रोक : ५०,१००,२०० मी.<br>बटरफ्लाय : ५०,१००,२०० मी.<br>वैयक्तिक मिडले : २००,४०० मी.<br>रिले : ४ x१०० मी. फ्रीस्टाईल व<br>डायव्हींग : १ व ३ मी. स्प्रिंगबोर्ड,<br>हायबोर्ड |
| १७ वर्षाआतील | फ्रीस्टाईल : ५०,१००,२००,४०० व ८०० मी.<br>बॅक स्ट्रोक : ५०,१००,२०० मी.<br>बेस्टस्ट्रोक : ५०,१००,२०० मी.<br>बटरफ्लाय : ५०,१०० मी.,२०० मी.<br>वैयक्तिक मिडले : २००,४०० मी.<br>रिले : ४ x१०० मी. फ्रीस्टाईल व<br>४ x१०० मिडले ४ x१०० मिडले<br>ड्रायव्हींग : १ व ३ मी. स्प्रिंगबोर्ड,<br>१ व ३ मी. हायबोर्ड | फ्रीस्टाईल : ५०,१००,२००,४०० मी.<br>बॅक स्ट्रोक : ५०,१००,२०० मी.<br>बेस्टस्ट्रोक : ५०,१००,२०० मी.<br>बटरफ्लाय : ५०,१००,२०० मी.<br>वैयक्तिक मिडले : २००,४०० मी.<br>रिले : ४ x१०० मी. फ्रीस्टाईल व<br>डायव्हींग : १ व ३ मी. स्प्रिंगबोर्ड,<br>हायबोर्ड |
| १४ वर्षाआतील | फ्रीस्टाईल : ५०,१००,२००,४०० मी.<br>बॅक स्ट्रोक : ५०,१००,२०० मी.<br>बेस्टस्ट्रोक : ५०,१००,२०० मी.<br>बटरफ्लाय : ५०,१००,२०० मी.<br>वैयक्तिक मिडले : २०० मी.<br>रिले : ४ x१०० मी. फ्रीस्टाईल व<br>४ x१०० मिडले ४ x१०० मिडले<br>डायव्हींग : ३ मी. स्प्रिंगबोर्ड,<br>हायबोर्ड १ मीटर हायबोर्ड १ मीटर | फ्रीस्टाईल : ५०,१००,२००,४०० मी.<br>बॅक स्ट्रोक : ५०,१००,२०० मी.<br>बेस्टस्ट्रोक : ५०,१००,२०० मी.<br>बटरफ्लाय : ५०,१००,२०० मी.<br>वैयक्तिक मिडले : २०० मी.<br>रिले : ४ x१०० मी. फ्रीस्टाईल व<br>डायव्हींग : ३ मी. स्प्रिंगबोर्ड, |

# ✻ मैदानी स्पर्धेतील स्पर्धा बाबींचा तक्ता ✻

| | खेळाच्या बाबी | | | | |
|---|---|---|---|---|---|
| स्पर्धक | धावणे | हर्डल्स | उडी | फेकी | चालणे |
| १४ वर्षाखालील मुले व मुली | १०० मी.<br>२०० मी.<br>४०० मी.<br>६०० मी.<br>४X१०० मी. रीले | ८० मी हर्डल्स<br>(उंची ७६.२ से.मी.) | उंच उडी<br>लांब उडी | गोळा फेक (४ कि.ग्रॅ.)<br>थाळी फेक (१ कि.ग्रॅ.) | |
| १७ वर्षाखालील मुले | १०० मी.<br>२०० मी.<br>४०० मी.<br>८०० मी.<br>१५०० मी.<br>३००० मी.<br>४X१०० मी. रीले | १०० मी हर्डल्स<br>(उंची ९१.४ से.मी.) | उंच उडी<br>लांब उडी<br>बांबू उडी<br>तिहेरी उडी | गोळा फेक (५ कि.ग्रॅ.)<br>थाळी फेक (१.५ कि.ग्रॅ.)<br>भालाफेक (७०० ग्रॅम)<br>हातोडा फेक (५.०० कि.ग्रॅ) | ५ कि.मी |
| १७ वर्षाखालील मुली | १०० मी.<br>२०० मी.<br>४०० मी.<br>८०० मी.<br>१५०० मी.<br>३००० मी.<br>४X१०० मी. रीले | १०० मी हर्डल्स<br>(उंची ७६.२ से.मी.) | उंच उडी<br>लांब उडी<br>तिहेरी उडी<br>बांबू उडी | थाळी फेक (१ कि.ग्रॅ.)<br>भालाफेक (६०० ग्रॅम)<br>गोळा फेक (४ कि.ग्रमॅ)<br>हातोडा फेक (४ कि.ग्रॅम) | ३ कि.मी. |
| १९ वर्षाखालील मुले | १०० मी.<br>२०० मी.<br>४०० मी.<br>८०० मी.<br>१५०० मी.<br>५००० मी.<br>४X१०० मी. रीले<br>४X४०० मी. रीले<br>क्रॉस कन्ट्री ५ कि.मी. | ११० मी हर्डल्स<br>(उंची ९९.० से.मी.)<br><br>४०० मी हर्डल्स<br>(उंची ०.९१.४ मी.) | उंच उडी<br>लांब उडी<br>बांबू उडी<br>तिहेरी उडी | थाळी फेक (१.७५ कि.ग्रॅ.)<br>भालाफेक (८०० ग्रॅम)<br>गोळा फेक (६ कि.ग्रॅम)<br>हातोडा फेक (६ कि.ग्रमॅ) | ५ कि.मी. |
| १९ वर्षाखालील मुली | १०० मी.<br>२०० मी.<br>४०० मी.<br>८०० मी.<br>१५०० मी.<br>३००० मी., ५००० मी.<br>४X१०० मी. रीले<br>४X४०० मी. रीले<br>क्रॉस कन्ट्री ३ कि.मी. | १०० मी हर्डल्स<br>(उंची ८४.०० से.मी.)<br>४०० मी हर्डल्स<br>(उंची ७६.२ मी.) | उंच उडी<br>लांब उडी<br>बांबू उडी<br>तिहेरी उडी | थाळी फेक (१ कि.ग्रॅ.)<br>भालाफेक (६०० ग्रॅम)<br>गोळा फेक (४ कि.ग्रॅम)<br>हातोडा फेक (४ कि.ग्रमॅ) | ३ कि.मी. |

# नोंदणी शुल्क व प्रवेश फी

१. शालेय स्पर्धा व जलतरण स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व शाळा व महाविदयालयांना नोंदणी शुल्क भरणे अनिवार्य आहे.

| क्र. | खेळ | | दर |
|---|---|---|---|
| १. | मैदानी स्पर्धा व जलतरण | ३ बाबी करता<br>प्रती रिले ५ खेळाडू | प्रती खेळाडू रु. १००/-<br>प्रती संघास रु. १००/- |
| २. | शालेय क्रिकेट सर्वगट मुले / मुली | प्रती संघास | रु. ५००/- |
| ३. | सुब्रतो व शालेय फुटबॉल सर्वगट मुले / मुली | प्रती संघास | रु. ४००/- |
| ४. | शालेय बॅडमिंटन, टेबलटेनिस, बास्केटबॉल सर्वगट मुले / मुली | प्रती संघास | रु. २५०/- |
| ५. | लॉनटेनिस, स्क्वॅश, जिम्नॅस्टिक्सचे सर्व प्रकार, स्केटींग, बुध्दीबळ, रायफल शुटींग | प्रती खेळाडूस | रु. १००/- |
| ६. | शालेय कबड्डी व खो-खो सर्वगट मुले / मुली | प्रती संघास | रु. १००/- |
| ७. | वरील खेळ सोडून सर्व सांघिक खेळ | प्रती संघास | रु. १५०/- |
| ८. | वरील खेळ सोडून सर्व वैयक्तीक खेळ | प्रती खेळाडूस | रु. ५०/- |

२. नोंदणी शुल्क रु. १०००/- किंवा शाळा व कनिष्ठ महाविदयालयाच्या पटसंख्येनुसार प्रत्येक विदयार्थ्यामागे रु. १/- यापैकी जी रक्कम जास्त असेल तो रक्कम नोंदणी शुल्क म्हणून घेण्यात येईल.

३. प्रवेश अर्ज दि. २७ जुलै ते १४ ऑगस्ट २०१८.(सुट्टीचे दिवस वगळून स. ११ ते १ आणि २ ते ५ या वेळेत स्वीकारले जातील.

४. प्रवेश फी व नोंदणी शुल्क फक्त धनादेश / डीडीव्दारे स्विकारले जाईल. धनादेश / डीडी - जिल्हा क्रीडा परिषद मुंबई शहर (District Sports Council Mumbai City) या नावाने देण्यात यावा

५. धनादेश काहीही कारणांनी परत आल्यास रु. १००० दंड व बँकेचे चार्जेस आकारण्यात येतील. दंड न भरल्यास नियमानुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

   १) प्रवेश फी वरील कालावधीतच घेण्यात येईल. प्रवेश फी भरतांना प्रवेश अर्ज सादर करणे आवश्यक आहे. प्रवेश अर्जाशिवाय फी स्विकारी जाणार नाही. प्रवेश अर्जामध्ये काही बदल करायचा असेल तर अंतिम प्रवेश अर्ज बदल करुन स्पर्धेच्या ५ दिवस अगोदर देणे बंधनकारक आहे.

   २) धनुर्विद्या, बुध्दीबळ, कॅरम, जिम्नॅस्टिक्स, योगा, मल्लखांब, स्केटिंग, स्क्वॅश, लॉन टेनिस, या खेळाची प्रवेश फी वैयक्तीक खेळाडू नुसार आकारण्यात येईल.

## शालेय क्रीडा स्पर्धा आयोजनाबाबत नियम

१. प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये मान्यताप्राप्त प्राथमिक, माध्यमिक शाळांना व कनिष्ठ महाविदयालयांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेकडील परिपत्रक राक्रीधो-२०५/प्र.क्र./१५/क्रीयुसे-१, दि. २ एप्रिल २००५ अन्वये शाळेमधील प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एका खेळाच्या शालेय क्रीडा स्पर्धेत भाग घ्यावा असे प्रस्तावित आहे. त्यानुसार प्रत्येक शाळेने क्रीडा संचालनालयामार्फत राज्यामध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या क्रीडा स्पर्धेत किमान दोन सांघिक व तीन वैयक्तिक क्रीडा प्रकारात सहभागी होणे बंधनकारक आहे.

२. सर्व संघांनी व खेळाडूंनी स्पर्धेच्या दिलेल्या वेळेच्या ३० मिनिटे आधी उपस्थित दयावी. दिलेल्या वेळेत संघ उपस्थित न झाल्यास दिलेल्या वेळेच्या १५ मिनिटे अधिक संघाची वाट बघितली जाईल. जर संघ त्या अधिक वेळतही नाही हजर झाला तर विरुध्द संघास विजयी घोषीत करुन पुढेचाल देण्यात येईल ह्याची नोंद सर्व क्रीडा शिक्षकांनी, मुख्याध्यापकांनी घ्यावी.

३. शालेय क्रीडा स्पर्धामधील प्रत्येक खेळातील व प्रत्येक वयोगटातील प्रत्येकस्तरावरील स्पर्धा बाद पध्दतीने घेण्यात येतील.

४. सांघिक क्रीडा स्पर्धामधील विजयी संघच फक्त पुढील स्तरावरील (राज्यस्तरापर्यंत) स्पर्धेत पात्र ठरतील.

५. वैयक्तिक क्रीडा प्रकारात मैदानी व जलतरण या प्रकारातील अनुक्रमे प्रथम व व्दितीय क्रमांकाचे खेळाडू जिल्हा स्तरापासून राज्यस्तरापर्यंत पाठविण्यात येतील. कुस्ती, ज्युदो, तायक्वाँदो, वेटलिफ्टींग, बॉक्सिंग इ. खेळाच्या बाबीतील फक्त प्रथम क्रमांकाचा खेळाडू जिल्हास्तरापासून राज्यतरापर्यंत सहभागी होऊल.

६. रिलेमध्ये (जलतरण व मैदानी) फक्त प्रथम क्रमांकाचे संघ जिल्हास्तरापासून राज्यस्तरापर्यंत पाठविण्यात येतील.

७. जिम्नॅस्टिक्स, तलवारबाजी, धनुर्विद्या, कॅरम, योगासन, मल्लखांब, रायफल शुटींग, बुध्दीबळ, स्क्वॅश, लॉनटेनिस इ. खेळामधील गुणानुक्रमे निवड करुन खेळाडू पुढील स्तरावर पाठविण्यात येतील.

८. क्रीडा स्पर्धा आयोजनाच्या तारखेमध्ये व ठिकाणामध्ये काही अपरिहार्य कारणामुळे किंवा राज्यशासनाकडून आलेल्या आदेशान्वये काही बदल करावयाचे झाल्यास ते अधिकृत सूचनेनुसार करण्यात येतील.

९. शालेय क्रीडा स्पर्धा त्या त्या खेळाच्या राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय एकविध क्रीडा संघटनांच्या नियमानुसार घेण्यात येतील. स्थळ व कालपरत्वे उदा. क्रिकेटमधील ओव्हर्स, फुटबॉल, हॉकीमधील वेळ, लॉन टेनिस मधील सेट संख्या इ. खेळामधील बदल करण्याचे अधिकार आयोजन समितीला राहतील.

१०. स्पर्धेसाठी आवश्यक असणारे क्रीडा साहित्य, संरक्षित साधने, त्या त्या संघाचे राहील. तसेच बॅडमिंटनसाठी शटल, लॉन टेनिससाठी बॉल, फुटबॉल, व्हॉलीबॉल इ. सहभागी होणाऱ्या खेळाडूंचे / संघाचे राहिल.

११. ज्या वजन गटात खेळाडू प्राथमिक स्वरुपात सहभागी होईल त्याच वजन गटात त्यास पुढील प्रत्येक स्तरावर सहभागी होता येईल.

१२. शालेय व इतर स्पर्धांमध्ये प्रत्येक खेळाडूने स्वत:च्या जबाबदारीने सहभाग घ्यावा. स्पर्धेदरम्यान कोणत्याही कारणास्तव खेळाडूस कोणतीही दुखापत / इजा झाल्यास अथवा दुर्घटना झाल्यास त्यास संयोजन समिती जबाबदार राहणार नाही व कोणत्याही प्रकारचा खर्च संयोजन समितीकडून मिळणार नाही.

१३. स्पर्धेत सहभागी होताना त्या त्या खेळाच्या एकविध संघटनेचे निश्चित केलेला गणवेश (स्पोर्टस किट) असणे अनिवार्य अहे. गणवेश नसेल तर स्पर्धेत सहभाग दिला जाणार नाही.

१४. शालेय, महिला व इतर स्पर्धेसाठी जिल्हास्तरापासून राज्यस्तरापर्यंत जाण्या-येण्यासाठी येणारा प्रवास खर्च हा ज्या त्या सहभागी शाळेने / मंडळाने / कनिष्ठ महाविद्यालयाने करावयाचा आहे. सदरचा खर्च शाळेस मिळणाऱ्या वेतनेतर अनुदानातून खर्च करण्यास पात्र आहे.

१५. प्रत्येक स्तरावर स्पर्धेमध्ये सहभागी होत असताना खेळाडूने स्वत:जवळ विहीत नमुन्यातील पात्रता प्रमाणपत्र व त्यावर सध्याचे पासपोर्ट साईज फोटो चिकटविलेले अनिवार्य राहील. पात्रता प्रमाणपत्रावरील फोटोवर व खाली मुख्याध्यापक / प्राचार्य यांची स्वाक्षरी व शिक्का असणे बंधनकारक राहील. (पात्रता प्रमाणपत्रावर कोणत्याही प्रकारची खाडाखोड दिसून आल्यास ओळखपत्र नियमबाह्य समजण्यात येईल.)

१६. जिल्हास्तरापासून पुढील स्तरावर सहभागी होत असताना पात्रता प्रमाणपत्रावर जिल्हा क्रीडा अधिकारी यांची प्रतीस्वाक्षरी असणे बंधनकारक राहील.

१७. शालेय क्रीडा स्पर्धेत १४ वर्षाखालील गटातील खेळाडूंनी स्पर्धेत सहभागी होत असताना शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र (वयोगटासंबंधी) असणे अनिवार्य आहे.

१८. मुदतीनंतर आलेल्या प्रवेशिकांचा विचार केला जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

१९. प्रथमिक प्रवेशिका व स्पर्धेच्या प्रवेशिका पोस्टाने पाठविल्यास त्या स्विकारल्या जाणार नाहीत. प्रवेशिका सादर करते वेळी प्रवेश फी भरल्याच्या पावतीचा क्रमांक नमूद करावा.

२०. क्रीडांगणावर संघासोबत शारीरिक शिक्षण शिक्षक / क्रीडा प्रमुख संघ व्यवस्थापक म्हणून असणे अनिवार्य आहे. मुलींच्या संघासोबत महिला व्यवस्थापक असणे अनिवार्य राहील.

२१. आवश्यक वाटल्यास खेळाडूची जन्मतारीख जनरल रजिस्टर मध्ये तपासण्याचा हक्क जिल्हा क्रीडा अधिकारी यांना राखून ठेवला आहे.

२२. प्रत्येक वयोगट निहाय मुले / मुलींचा प्रवेश अर्ज स्वतंत्र असावा. एकाच अर्जावर वेगवेगळे वयोगट आणि मुले / मुली असल्यास प्रवेश अर्ज बाद करण्यात येईल.

२३. वैयक्तिक खेळात प्रत्येक वयोगटात व वजनगटात ३ खेळाडू आणि सांघिक खेळात प्रत्येक वयोगटात ६ संघ असतील तरच नियमानुसार प्रमाणपत्र देण्यात येतील.

२४. तक्रार निवारण :-

अ) स्पर्धेच्या वेळी खेळाडूंबाबत तक्रार करावयाची असल्यास ती लेखी स्वरुपात संघ व्यवस्थापक / मार्गदर्शक / संघनायक यांनी सामना संपण्यापूर्वी अथवा सामना संपल्यानंतर ३० मिनिटांच्या आत तक्रार शुल्क रु. १००० / - (रुपये एक हजार फक्त) भरुन – संयोजकांकडे सादर करावे.

आ) तक्रार नोंदविणाऱ्या व्यक्तीने तक्रार नोंदविल्यानंतर तक्रारीबाबतचे पुरावे ३० मिनिटाच्या आत सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा तक्रार फेटाळण्यात येईल.

इ) पंच व तांत्रिक सदस्यांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द कोणतीही तक्रार नोंदवून घेतली जाणार नाही.

ई) संयोजक प्राप्त तक्रारीचा निर्णय लेखी स्वरुपात तक्रारदारास देतील.

२५. तक्रार निवारण समिती :- तक्रार निवारण समितीचे स्वरुप हे त्रिसदस्यीय राहील.

अ) उपसंचालक/ जिल्हा क्रीडा अधिकारी हे अनुक्रमे विभाग / जिल्हास्तरावर अध्यक्ष म्हणून समितीचे काम पाहतील.

आ) संबंधित एकविध खेळांच्या संघटनांचे प्रतिनिधी.

इ) क्रीडा मार्गदर्शक / क्रीडा अधिकारी.

ई) संबंधित खेळाचे पुरस्कारार्थी खेळाडू / तज्ञ अनुभवी क्रीडा शिक्षक.

उ) संबंधित खेळांच्या आयोजन समितीचे प्रमुख.

२६. स्पर्धा कार्यक्रमातील दिनांक, वेळ व जागेसंबंधी काही कारणास्तव बदल करण्याचा प्रसंग आल्यास बदल करण्याचे अधिकार जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई शहर यांनी राखून ठेवले आहेत.

२७. मैदानी स्पर्धेसाठी त्यांना दिलेल्या चेस्ट नंबरनुसार स्वत:नंबर तयार करुन प्रत्येक वर्षी सहभागी होणाऱ्या संस्थेतील, शाळांमधील किंवा महाविद्यालयातील खेळाडूंना वितरित करावे. दिलेल्या चेस्ट नंबर व्यतिरिक्त इतर नंबर संस्थेने वापरु नये. प्रवेशिका देताना खेळाडूचा चेस्ट नंबर नमूद करावा.

२८. कार्यालयातील अधिकारी यांचे संपर्क क्रमांक हे स्पर्धेच्या माहितीसाठी शाळा व क्रीडा शिक्षक यांच्या सोयीकरीता देण्यात आले आहेत. अधिकारी यांचे मोबाईल क्रमांक हे वैयक्तीक आहेत. खेळाडूं व पालक यांना खेळासंबंधी चौकशी करावयाची असल्यास कार्यलयीन वेळेत कार्यालयीन क्रमांकावर संपर्क करावा (८६५००३२३७३) अधिकाऱ्यांच्या क्रमांकावर पालक किंवा खेळाडूंनी वेळी अवेळी संपर्क केल्यास संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना लेखी पत्राव्दारे कळवण्यात येईल व ही बाब वारंवार घडल्यास संबंधित शाळेची तक्रार शिक्षण विभागाकडे करण्यात येईल.

२९. कार्यालयाचा ब्लॉग खेळाडू व पालक यांना देण्यात यावा कार्यालयाची सर्व माहिती ब्लॉगवर अपडेट करण्यात येते. स्पर्धा कालावधीमध्ये काहीही बदल झाल्यावर अपडेट करण्यात येते.

## राष्ट्रीय शालेय चॅम्पियनशिप ( एस. जी. एफ. आय. व्दारा मान्यता प्रात्प ) योगासनाचे नियम व अटी

१) राष्ट्रीय शालेय योगासन चॅम्पियनशिप स्पर्धा मुले व मुलींकरीता स्वतंत्रपणे घेतली जाईल. मुले व मुली यांचे स्वतंत्र तीन वयोगट पुढील प्रमाणे आहेत. वयोगट :- १४, १७, १९ वर्षाखालील मुले व मुली.

२) शाळेच्या प्रत्येक संघात जास्तीत जास्त पाच खेळाडू असावेत. ( त्यात एक खेळाडू राखीव धरुन ), ज्या संघात चार पेक्षा कमी खेळाडू असतील त्यांना सांघिक चॅम्पियनशिपमध्ये भाग घेता येणार नाही. परंतू वैयक्तिक स्तरावर अशा खेळाडूंच्या कामगिरीवर मुल्यांकन करता येईल. सांघिक चॅम्पियनशिप करिता केबळ चार सर्वोत्कृष्ट खेळाडूंचे गुणांकन विचारात घेतले जाईल.

३) ग्रुप –ए, ग्रुप – बी, आणि ग्रुप – सी आसनाचा स्पर्धेत समावेश आहे.

४) ग्रुप – ए ची आसने पुढीलप्रमाणे टिकवावीत : १४ वर्षाखालील गट - १.३० मि., १७ व १९ वर्षाखालील गट – २.३० मि.

५) ग्रुप – बी ची आसने खालीलप्रमाणे टिकवावीत : १४ वर्षाखालील गट – २० सेकंद, १७ व १९ वर्षाखालील गट –३० सेकंद.

६) ग्रुप – सी ची आसने खालीलप्रमाणे टिकवावीत : १४ वर्षाखालील गट – १५ सेकंद, १७ व १९ वर्षाखालील गट – २० सेकंद.

# आर्टिस्टिक योगा

सातव्या क्रमांकावरील प्रत्येक वयोगटातील स्पर्धकास आर्टिस्टिक योगा सादर कराव लागेल

## आर्टिस्टिक योगा आसने पुढील प्रमाणे

१) हस्त वृश्चिकासन

२) हस्त लिकासन

३) नटराजासन

४) स्तंभ सिरामन ( दुर्वासन )

५) उत्थित एकपाद (अंगुस्टासन ) (L)

६) स्तंभ एकपाद स्कंदासन

७) स्कंद पीडासन

८) उत्थित व्दिपाद स्कंदासन

दिलेल्या आसनांपैकी स्पर्धकांच्या इच्छेनुसार प्रत्येक ५ आसने करावी लागतील.
आसनांचा कालावधी १५ सेकंद राहील
आर्टिस्टिक योगामध्ये प्रणव ध्वनी अनिवार्य आहे.
जितका वेळ प्रणव ध्वनी ओंकार म्हटले जाईल तेवढे गुण खेळाडूस प्राप्त होतील.

Format

State/UT/Unit……………………………

NATIONAL SCHOOL GAMES 20…. To 20…..

Under the aegis of School Games Federation of India

Latest Photo name
With date duly
Attested by the principal
Head Master with Stamp

Certificate of Eligibility

Age Group under …………..Boys /Girls

| | | |
|---|---|---|
| 01 | Name of the Participant (In Block Letters) | |
| 02 | Father's Name (In Block Letters) | |
| 03 | Mother's Name (In Block Letters) | |
| 04 | Name of the School (In Block Letters) | |
| 05 | Full Address of School (In Block Letters) | |
| 06 | School's Phone No. with Code No. | |
| 07 | Last Year Registration No. SGFI | |
| 08 | Date of Birth (i) In Fig. (ii) In Words | |
| 09 | Aadhaar No. | |
| 10 | Passport No. (if available) | |
| 11 | Discipline | |
| 12 | Age in Completed years as on 31st December | Year Month Days |
| 13 | Permanent Address & Phone / Mob. No. (In Block Letters) | |
| 14 | Admission No. & Year | |
| 15 | Date of Joining the School | |
| 16 | Standard & Section Studying this year | |
| 17 | Standard Studying last year | |
| 18 | Bank Detail of participant (If no then mention Mother/Father A/C No.) | Name :<br>Name of Bank :<br>A/C No. :<br>IFSC Code : |
| 19 | Personal Identification Marks : | 1.<br>2. |
| 20 | Signature of the Participant | |

Certificate: 1. certified that the above participant is a bonfire student of this Institution for the academic year.
2. Certified that I have personally verified the admission records maintained in the School and found correct.
3. Certificate that it is understood in the event of information furnished above found to be partly or wholly untrue, the above students is liable to be disqualified for a period of two years in case the students is a member of the team, then the participant is liable to be disqualified as a whole.

Signature of Competent Authority of State/UT/Unit with Seal

Signature with Seal Manager / Coach
Post / Desn………………..

Signature with Seal of the Head of Institution/Principal Head Master

For Office Use Only    Name of Invigilator ………………………….....    Sign. of Invigilator……………………

# क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहर
# क्रीडा विकासासाठी राज्य शासनाच्या विविध योजना

## महाराष्ट्र राज्य शासनाच्या विविध योजना

महाराष्ट्र राज्यच्या क्रीडा धोरणाअंतर्गत प्रत्येक विभाग, जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी क्रीडा संकुल उभारण्याची सुधारीत योजना शासन निर्णय, सामाजिक न्याय,सांस्कतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र.राक्रीधो-२००३/प्र.क्र.११/क्रीयुसे-१, दि.२६ मार्च,२००३ अन्वये कार्यान्वित करण्यैंत आलेली आहे. शासनाने शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००९/(प्र.क्र.२५/०९)/क्रीयुसे-१ दि.२१ मार्च, २००९ अन्वये क्रीडा संकुल बांधकामाकरिता दयावयाच्या बांधकाम अनुदान मर्यादेत वाढ केली आहे.

**अ) विभागीय क्रीडा संकुल :- (अनुदान मर्यादा रू.२४००.०० लाख)**

विभागीय क्रीडा संकुलामध्ये १० लेनच्या सिंथेटिक ट्रॅकसह खुले प्रेक्षगृह, बंदिस्त जलतरण तलाव, बंदिस्त (वातानुकूलित) प्रेक्षगृह, अॅस्ट्रोटर्फ हॉकी मैदान व विविध खेळांची क्रीडांगणे, मुला मुलींची वसतिगृहे, पाणीपुरवठा/ड्रेनेज/विद्युतिकरण/अंतर्गत रस्ते/संरक्षक भिंत इत्यादी बाबींचा समावेश असून आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा साहित्य खरेदीचाही समावेश आहे.

**ब) जिल्हा क्रीडा संकुल :- (अनुदान मर्यादा रू.८००.०० लाख)**

प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हा क्रीडा संकुल उभारण्याचे प्रस्तावित आहे. जिल्हा क्रीडा संकुलामध्ये ४०० मी. ट्रॅकसह खुले प्रेक्षगृह, विविध खेळांची मैदाने, मल्टिजिम, वेटलिंफटींग, फिजिकल एक्झरसाईज हॉल, फिटनेस सेंन्टर, जलतरण तलाव, इनडोअर हॉल, मुला- मुलींची वसतिगृहे, पाणीपुरवठा/ ड्रेनेज/ विद्युतिकरण/ अंतर्गत रस्ते/संरक्षक भिंत इत्यादी बाबींचा समावेश असून क्रीडा साहित्य खरेदीचाही समावेश आहे.

**क) तालुका क्रीडा संकुल :- (अनुदान मर्यादा रू.१.०० कोटी)**

तालुक्याच्या ठिकाणी तालुका क्रीडा संकुल उभारण्याचे प्रस्तावित आहे. तालुका क्रीडा संकुलामध्ये ४०० मी. धावनपथ, इनडोअर गेम हॉल, खो-खो, हॉलीबॉल, कबड्डीची प्रत्येकी दोन मैदाने, बास्केटबॉल कोर्ट/ लॉन टेनिस वा अन्य सुविधा /शूटींग रेंज पाणीपुरवठा/ड्रेनेज/विद्युतिकरण/अंतर्गत रस्ते/संरक्षक भिंत इत्यादी बाबींचा समावेश असून क्रीडा साहित्य खरेदीचाही समावेश आहे.

**२.स्वयंसिध्दा महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम.**

शहरी भागातील अस्थिर व असुरक्षित जीवनमान लक्षत घेता प्रत्येक महिलेला आपल्या स्वत:च्या संरक्षणासाठी निर्भय,सक्षम,स्वयंसिध्द बनविणे तसेच वंसरक्षणाबाबतची भिती महिलांच्या मनातून घालवून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे व निर्भय मानसिकता निर्माण करणे हाच या योजनेचा मुख्य उद्देश आहे. खेळाद्वारे सर्वांसाठी सुदृढता या कार्यक्रमांतर्गत सर्व नागरिकांच्या सुदृढतेबरोबरच स्वसरंक्षण ही एक काळाची गरज बनली आहे. सन २००३ पासून शासनाच्या क्रीडा विभागामार्फ़त महिलांसाठी
स्वसंरक्षणाची निर्भय योजना राबविण्यात येत आहे.

आजच्या काळात व्यवसायासाठी,नोकरीसाठी,शिक्षणसाठी घरातुन बाहेर पडणा-या महिलांना स्वयंसिध्द बनविणे ही सामाजिक बांधिलकी समोर ठेवुन शासनाने या योजनेची आखणी केली आहे. सर्व महिलांना

आत्मविश्वासपुर्ण स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देणे हे जरुरीचे झाले आहे.या करिता शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार ज्युदो / तायक्वांदो खेळातील तज्ञ व्यक्तींशी विचारविनिमय करुन तयार केलेल्या अभ्यासक्रमानुसार महिला वर्गाला स्वंरक्षणाचे डावपेच (ज्युदो,तायक्वादो,मार्शलआर्ट,लाठी काठी,) शारीरिक तंदुरूस्तीचे व्यायाम प्रकार,योगासन,हास्यउपचार पध्दती,स्वयंरोजगार इत्यादीचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच स्त्रियांच्या सर्वांगिण विकासासाठी शरीररचना स्नायु दुखापती,खेळाडूचे मानसिक व शारीरिक पुनवर्सन,महिलांचे आरोग्य आहार मार्गदर्शन,व्यक्तिमत्व विकास,व्यवसाय मार्गदर्शन, स्वंयरोजगार, आणि करिअर मार्गदर्शन,होम मॅनेजमेंट,फायरब्रिगेंड ट्रेनिंग-संकल्पना,प्रात्यक्षिके ,ट्रॅफिक-नियम-माहिती -प्रात्यक्षिके महिलांच्या समस्या व निराकरण व महिला विषयक कायदयातील तरतूदी इ.विषयावर तज्ञामार्फत व्याख्यान दिले जाते

## १. महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेमार्फत क्रीडा संस्थांना आर्थिक सहाय्य

महाराष्ट्र राज्यत क्रीडा व खेळांच्या विकासासाठी कार्यरत असलेल्या एकविध खेळाच्या जिल्हा व राज्यसंघटना, क्रीडा संस्था, क्रीडा मंडळे तसेच इतर कार्यक्रमाबरोबर क्रीडा विकासाचे कार्य करणा-या संस्थांना महाराष्ट्र राज्यक्रीडा परिषदेच्या निधीतून आर्थिक सहाय्य देण्यात येते.

शासनाने मान्यता दिलेल्या खेळांच्या जिल्हा, राज्यसंघटनांना तसेच क्रीडा संस्थांना खालील बाबींकरिता अनुदान देण्यात येते.

| बाब | राज्यसंघटना | जिल्हा संघटना | स्थानिक संघटना |
|---|---|---|---|
| निर्वाह अनुदान. | प्रति जिल्हा रु.१०००/- किंवा गत वर्षातील खर्चाच्या **५०** टक्के | कमाल रु.५०००/- किंवा गत वर्षातील खर्चाच्या **५०** टक्के | कमाल रु.५००/- किंवा गत वर्षातील खर्चाच्या ५० टक्के |
| क्रीडा साहित्य खरेदीसाठी अनुदान. | रु.५०००/- | रु.५०००/- | र.२०००/- |
| अधिकृत राज्यस्पर्धांच्या आयोजनासाठी अनुदान. | कमाल रु.१०००००/- किंवा गत वर्षातील खर्चाच्या **५०** टक्के | कमाल रु.५००००/- | -- |
| अधिकृत राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या आयोजनासाठी अनुदान. | कमाल रु.२०००००/- किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या **५०** टक्के | कमाल रु.१०००००/- | -- |

## ४.आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण करण्याकरीता अनुदान

क्रीडापीठाची संकल्पनेच्या प्रभावी अंमलबजावणीअंतर्गत आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार करण्यासाठी सहाय्यक अनुदान उपलब्ध करुन देणे. महाराष्ट्र राज्यच्या क्रीडा धोरणामुळे क्रीडा क्षेत्राला चालना मिळालेली आहे. खेळाडूंच्या कामगिरीत वाढ करण्यासाठी अत्याधुनिक साहित्य, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मार्गदर्शकाकडून मार्गदर्शन मिळाल्यास त्यांच्या कामगिरीमध्ये वाढ होऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचा नावलौकिक वाढण्याच्या उद्देशाने शासनाने शासन निर्णय क्र. राक्रीधो -३११३/प्रक्र.२९/क्रीयुसे-३, दि.२८.४.२०१४ नुसार योजनेस मान्यता प्रदान केली आहे. खालील बाबीवर रु.५.०० लक्ष मर्यादेत अर्थसहाय्य देण्यात येते.

१.क्रीडा साहित्य आयात करणे. २.क्रीडा गणवेश आयात करणे. ३. क्रीडा प्रशिक्षणासाठी देशांतर्गत व देशाबाहेरील प्रवास, निवास, भोजन इ. ४. प्रशिक्षण कार्यक्रम शुल्क, ५ .चित्रफीत, पुस्तके इ. बाबींवरील खर्च अनुज्ञेय आहे.

### ५. व्यायामशाळा विकास अनुदान (जिल्हास्तर योजना)

पारंपारिक खेळ व क्रीडा विषयक बाबींचे जतन व्यायामशाळा व तालमी यांच्या माध्यमाव्दारे होत असून, युवकांची शारीरिक सदृढता वाढविणे हे उदिदृष्ट साध्य करण्यासाठी स्वायत्त संस्था अतिशय महत्वाची कामगिरी बजावत आहेत.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.क्रीडाधो-३११३/प्र.क्र.३९/क्रीयुसे-३, दिनांक २२ जानेवारी २०१४ अन्वये, अशा पंजीबध्द व्यायामसंस्था/ तालमी /क्रीडा मंडळे/ शैक्षणिक संस्था यानां नविन व्यायामशाळा बांधकाम किंवा दुरुस्ती, नूतनीकरण आणि आधुनिक व्यायाम साहित्य खरेदीसाठी अंदाजित खर्चाच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त रु.सात लाख यापैकी कमी असेल इतके अनुदान देण्यात येते. विशेष घटक योजनेसाठी शासनाने घोषित केलेल्या दलित वस्तीच्या आणि आदर्श गांवातील, तसेच शासनाने घोषित केलेल्या आदिवासी भागातील पात्र संस्थांना अंदाजित खर्चाच्या ९० टक्के किंवा जास्तीत जास्त रु. सात लाख यापैकी कमी असेल इतके अनुदान देण्यात येते.

### ६. क्रीडांगण विकास अनुदान (जिल्हास्तर योजना)

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.क्रीडाधो-३११३/प्र.क्र.४८/क्रीयुसे-३,दिनांक १३-२-२०१४अन्वये, ग्रामीण व नागरी व त्याचप्रमाणे आदिवासी भागात विविध खेळांची सुयोग्य क्रीडांगणे निर्माण करण्यासाठी खर्चाच्या ७५टक्के किंवा जास्तीत जास्त **७.००लाख** यापैकी कमी असेल इतके अनुदान दोन हप्त्यात अनुदानित संस्थेद्वारा अनुदाना इतकी रक्कम खर्च करण्याचे अटीवर दिले जाते. आदिवासी भागातील खाजगी संस्थांना **खर्चाच्या ९० टक्के किंवा जास्तीत जास्त रु.७.०० लाख** यापैकी कमी असेल इतके अनुदान दोन हप्त्यात देण्यात येते.  आदिवासी विभागामार्फत चालविल्या जाणा-या शासकीय आश्रमशाळांना १०० टक्के अनुदान परंतु कमाल रु.७.०० लाख इतके अनुदान दोन हप्त्यात देण्यात येते. हे अनुदान राज्यतील खाजगी शैक्षणिक संस्थेद्वारा चालविण्यात येणा-या माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये तसेच विविध खेळांच्या विकासासाठी कार्यरत असणा-या स्वयंसेवी क्रीडामंडळे, युवक मंडळे व महिला मंडळे याशिवाय आदिवासी मुलांमुलींकरिता शासनामार्फत कार्यरत आश्रमशाळांना देण्यात येते.

### ७. ग्राम/शहर क्रीडा संकुलाची स्थापना

ग्रामीण व शहरी भागात क्रीडा विषयक पायाभत सुविधा विकसित करण्यासाठी **ग्राम** व शहर क्रीडा संकुल या योजनेअंतर्गत सर्वप्रथम १०००० लोकसंख्या व किमान ५००० लोकसंख्या असलेल्या गावांचा विचार करण्यात येतो. केंद्र स्थापनेसाठी किमान ३ एकर जागा एकाच ठिकाणी असणे आवश्यक आहे. क्रीडांगण समपातळीत करणे, धावनपथ तयार करणे, संरक्षण भिंत, विविध खेळांची क्रीडांगणे तयार करणे, क्रीडा साहित्य, प्रसाधन गृहे व भांडारगृहे  इ. बाबींसाठी रु.१०.०० लक्ष एवढे अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. निधीच्या १० टक्के इतका निधी लोकवर्गणी, जिल्हा परिषद निधी व अन्य मार्गने संकलित करण्याची तरतूद आहे. सदर केंद्र विकसित करण्यासाठी नगराध्यक्ष/सरपंच अध्यक्ष व मुख्य अधिकारी, नगरपरिषद/ग्रॅमसेवक सदस्य अशी समिती स्थापन केलेली आहे. ज्या शहरांची अथवा गावांची लोकसंख्या सन-२००१ च्या जनगणनेनुसार किमान १०,००० अथवा ५००० आहे अशा ग्रामीण/शहरी स्तरावर बहुउद्देशीय क्रीडा विकास केंद स्थापन करण्याची बाब शासन विचाराधीन होती. अशा ठिकाणी किमान सुविधा उपलब्ध क्रीडा क्षेत्रामध्ये अतिशय शिघ्र प्रगती करावयाच्या दृष्टीने योग्य त्या क्रीडा सुविधा **ग्राम** पातळीपर्यंत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहेत.

## ८. समाजसेवा शिबीर भरविणे (जिल्हास्तर योजना)

राज्यतील १५ ते ३५ वयोगटातील विद्यार्थी व विद्यार्थीतर युवकांना शारीरिक श्रमाची कल्पना यावी यासाठी समाजसेवा शिबिराचे आयोजन करण्यात येते. याअंतर्गत युवकांचे शारीरिक श्रम व कठीण परिश्रम यांचे महत्व पटेल असे रचनात्मक कार्यक्रम आयोजित करणे. युवकांच्या समस्येबाबत चर्चा घडवून आणणे. शिबिरात प्रत्येक दिवशी सकाळी शारीरिक कवायती व सायंकाळी खेळांचे सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करणे इ. कार्यक्रम अंतर्भुत आहेत. या योजनेअंतर्गत युवक कल्याण क्षेत्रात कार्यरत असणा-या पंजीबध्द संस्थानां त्यास्तीत ज्यास्त रु.२५,०००/- पर्यंत अनुदान देण्यात येते.

## ९. ग्रामीण व शहरी युवक मंडळ आर्थिक सहाय्य (जिल्हास्तर योजना)

**ग्रामिण** तसेच शहरी भागातील १५ ते ३५ वर्षे वयोगटातील युवकांसाठी समाजसेवा शिबिर, युवा नेतृत्व प्रशिक्षण शिबीराचे आयोजन, अस्पृश्यता विरोधी मोहिम. आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, प्रथमोपचार, स्वयंरोजगार कार्यक्रम, जिल्हा व तालुका पातळीवर युवक महोत्सवाचे आयोजन. युवक पत्रिका प्रकाशित करणे. युवकांच्या समस्येवर चर्चासत्र, वाद-विवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, काव्य गायन स्पर्धा, ग्रामीण विकास कार्यक्रम उदा.वृक्षरोपण, स्वच्छता मोहिम, आरोग्य व स्वच्छता विषयक शिबीरे. बेरोजगार युवकांसाठी कार्य केंद्र स्थापन करणे. सांस्कृतिक कार्यक्रम उदा.नाटय, नृत्य, संगीत इ. बाबत स्पर्धा, युवक आदान प्रदान कार्यक्रम आयोजित करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना एक किंवा अनेक कार्यक्रम राबविण्यासाठी एका आर्थिक वर्षात ज्यास्तीत ज्यास्त रु. २५,०००/- इतके आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात येते.

## १०. क्रीडा प्रबोधिनी

राज्यातून जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय किर्तीचे खेळाडू तयार व्हावेत यासाठी नेमलेल्या उच्चस्तरीय तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार राज्यातील खेळ परंपरा, उपलब्ध क्रीडा सुविधा व अंत:सामर्थ्य यांचा सारासर विचार करून राज्यात पुणे, कोल्हापूर, नाशिक, ठाणे, अमरावती, नागपूर, गडचिरोली, अकोला, औरंगाबाद, प्रवरानगर (जि.अहमदनगर), सांगली अशा ११ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी व या सर्व प्रबोधिनींवर देखरेख ठेवणारी तसेच उच्चतम दर्जाचे क्रीडा प्रशिक्षण देणारी एक मध्यवर्ती क्रीडा संस्था शिवछत्रपती क्रीडानगरी, पुणे येथे कार्यरत आहे. क्रीडा प्रबोधिनी प्रवेशाकरीता शिक्षण संचालनालय व क्रीडा व युवकसेवा संचालनालय यांच्या संयुक्त विदयमाने शाळास्तरावर, तालुकास्तरावर व जिल्हास्तरावर संबंधित जिल्हयातील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शिक्षणाधिकारी कार्यालय, तालुका क्रीडा अधिकारी कार्यालय व गटशिक्षणाधिकारी कार्यालय यांचे मार्फत व राज्यपातळीवर शिवछत्रपती क्रीडापिठामार्फत महाराष्ट्रातील ८ ते १४ वयोगटातील मुला-मुलीं साठी क्रीडा नैपुण्य चाचण्यांचे आयोजन करुन पात्र मुला-मुलींच्या वैदयकीस तपासणी अहवालानुसार प्रशिक्षणार्थींची अंतिम प्रवेशासाठी निवड करण्यात येते. अशा खेळाडूंना संबंधित खेळाचे विशेष प्रशिक्षणासह निवास, भोजन व शालेय शिक्षणाची सुविधा शासनाच्या संपूर्ण खर्चाने उपलब्ध करुन दिली जात आहे.

## ११. क्रीडा महोत्सव.

क्रीडा आणि युवक सेवा संचालनालयामार्फत तालुका, जिल्हा, विभागीय आणि राज्यस्तरावर शालेय, ग्रामीण, महिला, क्रीडा स्पर्धा याशिवाय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल, ज्युनिअर व सब ज्युनिअर नेहरु हॉकी इ. स्पर्धांचे आयोजन प्रतिवर्षी करण्यात येते. राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन संचालनालयाव्दारा संबंधित जिल्हयांच्या जिल्हा क्रीडा परिषदेच्या सहकार्याने करण्यात येते. वरील सर्व स्पर्धांतील सर्व खेळाडूंचा निवास, प्रवास, भोजन खर्च तसेच पंच, निवड समिती सदस्य यांचा प्रवास व दैनंदिन भत्ते व

स्पर्धा आयोजन खर्च या योजनेअंतर्गत करण्यात येतो. राज्यस्तरीय स्पर्धेतून संबंधित खेळाच्या प्रातिनिधीक संघासाठी खेळाडूंची निवड करुन राष्ट्रीय स्पर्धेकरिता शासनामार्फत संघ पाठविण्यात येतो.

## १२. शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार.

राज्याच्या क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या व्यक्ति तसेच खेळाडू यांचा यथोचित गौरव करण्यासाठी खालील क्रीडा पुरस्कार शासनातर्फे प्रदान करण्यात येतात.

१) शिवछत्रपती राज्यक्रीडा जीवन गौरव पुरस्कार
२) क्रीडा मार्गदर्शकांसाठी उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार
३) शिवछत्रपती राज्यक्रीडा पुरस्कार (खेळाडू/संघटक कार्यकर्ते)
४) राज्यसाहसी क्रीडा पुरस्कार
५) एकलव्य राज्यक्रीडा पुरस्कार
६) संघटक / कार्यकर्ते यांस जिजामाता राज्यक्रीडा पुरस्कार
७) जिल्हा क्रीडा पुरस्कार

## १३. राज्य क्रीडा विकास निधी स्थापना :

क्रीडा संस्कृतीची जोपासना व संवर्धन राज्यमध्ये परिणामकारक रित्या करण्याच्या दृष्टीने व राज्यत क्रीडा सुविधा निर्माण करणे, दर्जेदार खेळाडूंना परदेशी क्रीडा मार्गदर्शकाची सेवा उपलब्ध करुन देणे नावाजलेल्या खेळाडूंना अर्थसहाय्य करणे, काही गुणवान खेळाडू व संघ दत्तक घेऊन त्यांच्याव्दारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विजेते खेळाडू घडविणे व क्रीडा विकासामध्ये शासकीय संस्था, निमशासकीय संस्था, औद्योगिक व वाणिज्यीक प्रतिष्ठाणे, स्वयंसेवी संस्था यांचा सहभाग करणे.

## १४. राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय स्तरावर अतुलनीय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडूनां मानधन.

राज्याचे नाव राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्वल केलेल्या खेळाडूंना वृध्दापकाळात सन्मानाने जीवन जगता यावे या करीता मानधनात वाढ करण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतलेला आहे. सुधारीत मानधन १ एप्रिल २०१० पासुन देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. महाराष्ट्र केसरी हा किताब प्राप्त करणा-या कुस्तीगीराचा समावेश वयोवृध्द खेळाडूच्या मानधन योजनेत करण्याचा महत्वपुर्ण निर्णय दि. ६ मार्च २०१० रोजी शासनाने घेतलेला आहे.

**२१ डिसेंबर २०१२ च्या शासन निर्णयानुसार खालील प्रमाणे मानधनात वाढ करण्यात आलेली आहे.**

| स्पर्धेचा स्तर | प्रचलित मानधन | सुधारित मानधन |
|---|---|---|
| राष्ट्रीय स्तर वयोवृध्द खेळाडू | रु. १५००/- | रु. २,५००/- |
| आंतरराष्ट्रीय स्तर वयोवृध्द खेळाडू (ऑलिम्पिक/जागतीक कुस्ती स्पर्धा)<br>(आशियाई/एशीयन/राष्ट्रकुला) | रु. ३०००/-<br>रु. ३०००/- | रु. ६,०००/-<br>रु. ४,०००/- |
| हिंदकेसरी, रुस्तमे-हिंद, महान भार केसरी, भारत केसरी, महाराष्ट्र केसरी किताबप्राप्त कुस्तीगीर | रु. ४,०००/- | रु. ६,०००/- |

**१५. कुस्ती कला विकासासाठी आर्थिक मदत.**

राज्यात कुस्ती कलेच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र राज्यकुस्तीगीर परिषद यांचेव्दारा उदयोन्मुख हौशी कुस्तीगीरांसाठी सामने व शिबीरे भरविली जातात. वार्षिक अधिवेशनांत गादी व माती विभागात विविध गटांखाली कुस्त्यांच्या चढाओढी होऊन प्रत्येक वजन गटातील प्रथम सहा क्रमांकाच्या कुस्तीगिरानां पुढील प्रमाणे दरमहा मानधन देण्यात येते.

| प्रथम | व्दितीय | तृतीय | चतुर्थ | पाचवा | सहावा | सहा क्रमांकानतंर सर्व सहभागी कुस्तीगिरानां |
|---|---|---|---|---|---|---|
| २४०० | २२०० | २००० | २००० | १६०० | १४०० | १००० |

उदयोन्मुख (कुमार गट) कुस्तीगिरांसाठी

| प्रथम | व्दितीय | तृतीय | चतुर्थ | चार क्रमांकानतंर सर्व सहभागी कुस्तीगिरानां |
|---|---|---|---|---|
| २००० | १५०० | १००० | १००० | ६०० |

ग्रिकोरोमण प्राविण्यप्राप्त कुस्तीगिरांसाठी

| प्रथम | व्दितीय | तृतीय | चतुर्थ | पाचवा | सहावा |
|---|---|---|---|---|---|
| २४०० | २००० | १५०० | १५०० | १२०० | १००० |

प्राविण्यप्राप्त महिला कुस्तीगिरांसाठी

| प्रथम | व्दितीय | तृतीय | चतुर्थ |
|---|---|---|---|
| २४०० | २००० | १५०० | १५०० |

**१६. अद्ययावत व्यायामशाळा विकास व कुस्ती, ज्युदो, कराटे जिम्नॅस्टिक्स, ॲथलेटिक्स, वेटलिफिटंग, स्विमींग खेळांचे अद्ययावत साहित्य अनुदान**

राज्यातील व्यायामशाळांचा विकास घडवून राज्यतील युवकांच्या शारीरिक क्षमतेचा विकास करण्याकरिता शासनामार्फत क्रीडा संस्था, व्यायामशाळा, शैक्षणिक संस्थांना जास्तीत जास्त रु.१,००,०००/- व शासकीय अनुदानाच्या २५ टक्के रक्कम संस्थेचा हिस्सा अशा एकूण रक्कमेचे आधुनिक व्यायाम साहित्य याशिवाय जिम्नॅस्टिक , थलेटिक्स, वेटलिफिटंग, व स्विमींग या खेळाचे साहित्य शासनातर्फे पुरविण्यांत येते.

शासकीय अनुदानातून व्यायाम साहित्याची मागणी करण्यासाठी नोंदणीकृत संस्थेकडे स्वत:च्या मालकीच्या अथवा दीर्घ मुदतीच्या कराराच्या जागेवर किमान ५०० चौ. फूट व बांधकाम नियमानुसार उंचीची इमारत आवश्यक आहे. तथापि जिम्नॅस्टिक, थलेटिक्स, वेटलिफिटंग व जलतरण खेळाचे अद्ययावत साहित्यासाठी संबंधित संस्थेकडे इमारतीची आवश्यकता नाही तथापि, त्या त्या खेळाच्या सुविधा असणे आवश्यक आहे.

१७. **क्रीडा नैपुण्य शिष्यवृत्ती**

राज्यात तालुका ते राष्ट्रीय स्तरावर भारतीय खेल महासंघ तसेच भारतीय क्रीडा प्राधिक्ररणाच्या शालेय, महिला, ग्रामीण(पायका) क्रीडा स्पर्धाचे आयोजन क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत प्रतिवर्षी करण्यात येते. महाराष्ट्र राज्यहे गत पाच वर्षापासून शालेय क्रीडा स्पर्धेत पदक तालिकेत अग्रस्थानावर आहे.

राज्यातील खेळाडू करीत असलेल्या क्रीडा कामगिरिची दखल घेउन खालील प्रमाणे शिष्यवृत्तीत वाढ करण्याचा तसेच आंतरराष्ट्रीय शालेय स्पर्धेत प्राविण्य संपादन व सहभाग घेणा-या खेळाडूंना मानधन देण्याचा महत्वपुर्ण निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,शासन निर्णय क्र.अताप्र-१००८/(प्र.क्र.४२८/०८)/क्रीयुसे-२,दि.२२ मार्च २०१० अन्वये घेतला आहे.

| प्राविण्य | प्रचलित शिष्यवृत्ती रक्कम | सुधारीत शिष्यवृत्ती रक्कम | आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा प्रचलित शिष्यवृत्ती रक्कम | आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा वार्षीक शिष्यवृत्ती रक्कम |
|---|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | ९,०००/- | ११,२५०/- | २४,०००/- | ३०,०००/- |
| द्वितीय क्रमांक | ७,२००/- | ८,९५०/- | १८,०००/- | २२,५००/- |
| तृतीय क्रमांक | ५,४००/- | ६,७५०/- | १२,०००/- | १५,०००/- |
| सहभाग | ३,०००/- | ३,७५०/- | ९,०००/- | ११,२५०/- |

**१८. जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रची स्थापना.**

राज्यातील प्रत्येक जिल्हयांत जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रची स्थापना करुन या केंद्रचे ठिकाणी क्रीडा प्रशिक्षणाच्या अदयावत सुविधा उपलब्ध करुन घेऊन या सुविधांच्या माध्यमातून जिल्हयातील खेळाडूनां नियमित स्वरुपात क्रीडा प्रशिक्षण देण्यात येईल.

राज्यतील ज्या जिल्हयात जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केद्र स्थापन होण्यास शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे असे केद्र अनुदानास पात्र समजण्यात येईल. मान्यता प्राप्त जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रने आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा क्रीडा परिषद यांचे कडे अर्ज सादर करावा त्यानीं सदर अर्ज आयुक्त क्रीडा व युवकसेवा महाराष्ट्र राज्यपुणे यांचेकडे मंजूरीसाठी सादर करावा.

जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रस क्रीडा साहित्य व क्रीडा प्रशिक्षण उपकरणे, खेळाडूनां ट्रॅकसूट व गणवेश,अंशकलीन मैदान सेवकाचे मानधन, क्रीडा विषयक वाङ:मय, सी.डी.पुस्तके, नियतकालीके, मासिके इ.कार्यालयीन/सादील खर्च, प्रशिक्षकाचां प्रवास खर्च, क्रीडांगण देखभाल व दुरुस्ती, चर्चासत्र/परिसवाद/उजळणी वर्ग(वर्षातून किमान दोन वेळा) समुपदेशन, प्रशिक्षण केंद्रच्या प्रसिध्दीसाठी ब्रोशर तयार करणे, प्लेक्स बोर्ड, पोस्टर्स, स्थानिक वृत्तपत्र/केबल वाहिनी व प्रशिक्षण शिबीर इ. करिता दरवर्षी प्रति जिल्हा रु.१४,४८,५००/- इतके अनुदान देण्यात येईल.

**१९. क्रीडा गुण सवलतः-**

इयत्ता १०वी व इयत्ता १२ वी परिक्षेस बसलेल्या व मान्यताप्राप्त राज्य ,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणा-या खेळाडूंना यापुर्वी अंतिम परिक्षेत नापास झाल्यास सवलतीचे २५ गुण फक्त उतीर्ण होण्याकरीताच देण्यात येत होते.

तथापी शासनाने दि.२१ एप्रील २०१५च्या सुधारीत शासन निर्णयानुसार फक्त अनुतिर्ण खेळाडूंना देण्यात येणारे सवलत गुणाची तरतुद बंद करुन इयत्ता ९ वी ते १२ च्या परिक्षेस बसलेल्या खेळाडूंना खालीलप्रमाणे सुधारीत सवलत देणेचा शासनाणे निर्णय घेतला आहे.

- क्रीडा विभागाद्वारा आयोजित राष्ट्रीय स्पर्धा प्राविण्य २५ गुण
- क्रीडा विभागाद्वारा आयोजित राष्ट्रीय स्पर्धा सहभाग व राज्यस्तरीय स्पर्धेत प्राविण्य २० गुण
- क्रीडा विभागाद्वारा आयोजित राज्यस्तरीय स्पर्धा सहभाग १५ गुण
- अधिकृत संघटनेच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग व राष्ट्रीय स्पर्धेत प्राविण्य २५ गुण
- अधिकृत संघटनेच्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग व राज्यस्पर्धेत प्राविण्य २० गुण
- अधिकृत संघटनेच्या राज्यस्पर्धेत सहभाग १५ गुण

## २०. पुरस्कार विजेते खेळाडू व कुस्तीगीर यांना सदनिका मिळणेबाबत

प्रचलित नियमानुसार रुस्तम ए हिंद,महान भारत केसरी,हिंदकेसरी किताब पटकाविणा-या कुस्तीगीर यांना मा.मुख्यमंत्री महोदय यांचे स्वेच्छाधिकारामधुन सदनिका मिळणकरीता सवलत देण्यात येत होती.दि. १८ मार्च २०१३च्या शासन निर्णयामध्ये पद्म पुरस्कार,ऑलिम्पीक,एशियन व राष्ट्रकुल स्पर्धेमधील पदक विजेत्यांना सदर योजनेमधुन सदनिका मिळणेसाठी पात्र ठरविण्याबाबतची तरतुद करणेत आलेली आहे.

## २१. इ ११ वी प्रवेशासाठी खेळाडूंना ३ टक्के आरक्षण

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. एचएससी - १७०७/(२२२/०७) / उमाशि-१, दि.२६ जून २००८, अन्वये भारतीय शालेय खेळ महासंघ पुरस्कृत विभागिय क्रीडा स्पर्धेत पदक विजेत्या खेळाडूनां, राज्य-राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना तसेच एकविध खेळांच्या मान्यता प्राप्त संघटनेच्या राज्यस्तर अजिंक्यपद स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडूनां व राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूनां इयत्ता ११ वी प्रवेशासाठी ५ टक्के जागा राखून ठेवण्याबाबत शासनाने मान्यता दिलेली आहे.

## २२. अत्त्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षण

खेळाडूंना नोकरीमध्ये आरक्षण असावे याकरीता शासनाने ऐतिहासीक निर्णय घेतला आहे. राज्य, राष्ट्रीय, आतंरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत प्राविण्य प्राप्त करणा-या खेळाडूंना शासन सेवेत ५ टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे.

शासनाच्या विविध विभागात, शासनाच्या मालकीच्या व नियंत्रणाखाली असलेल्या महामंडळात, स्थनिक प्राधिकरणात व विविध स्वरुपात शासकीय सवलती प्राप्त केलेल्या संस्थांमध्ये राज्यतील अत्त्युच्च गुणवत्ताप्राप्त खेळाडूंसाठी नोक-यांमध्ये आरक्षण ठेवण्याचा निर्णय, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/ क्रीयुसे-२, दि.३०एप्रिल, २००५, २१ जून, २००६ व दि.१८ नोव्हेंबर, २००६ अन्वये घेतला आहे.

खेळाडूंना शासकीय/निमशासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याचा राज्यशासनाने महत्वपूर्ण निर्णय घेतला असून “अ” संवर्गासाठी ऑलिम्पिक, आशियाई, जागतिक अजिंक्यपद स्पर्धा, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा तसेच “ब” संवर्गा साठी युवा राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, आशियाई अजिंक्यपद स्पर्धा, ज्युनि. जागतिक अजिंक्यपद स्पर्धा इत्यादी स्पर्धेतील प्राविण्यधारक खेळाडू हा पात्र राहणार आहे.

शूटींगमध्ये जागतिक विक्रमाची बरोबरी साधणारी कु. तेजस्विनी सावंत, श्री. नवनाथ फरताडे-शुटींग, श्री. अजय लाकरा (हॉकी), श्री. नरसिंग यादव-कुस्ती, श्री. सुहास खामकर-शरीर सौष्ठव, श्रीमती. स्नेहल साळूंखे-कब्बडी, श्रीमती. राही सरनोबत- शूटींग, श्रीमती. सुवर्णा बारटक्के-कबडडी, श्रीमती. अभिलाशा म्हात्रे-कबड्डी, श्रीमती. दिपिका जोसेफ- कबड्डी, श्री. संदीप तरटे-शूटींग, श्रीमती. विजया नर - पॉवरलिफटींग, विद्या शिरस-वेटलिफ्टींग, श्रीमती उज्चला माने-वेटलिफ्टींग, श्री. जगन्नाथ लकडे - अथलेटिक्स या खेळाडूंना राज्य शासनाच्या वतीने शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्यात आली आहे.

श्री. तृणाल हेलेगांवकर- सेलिंग, करण रस्तोगी - टेनिस, श्रीमती. प्राजक्ता सावंत - बॅडमिंटन हे राज्यशासनाच्या वतीने शासकीय सेवेत थेट नियुक्ती करीता पात्र ठरले आहेत.

आतापर्यंत ४३३९ खेळाडूना शासकीय नोकरीचा लाभ देण्यासाठी कामगिरी (५ टक्के खेळाडू आरक्षणात )प्रमाणीत करुन देण्यात आलेली आहे.

**सदर योजनेचा नविन शासन निर्णय दिनांक १ जुलै २०१६ अन्वये झाला आहे.**

## २३. स्व. खाशाबा जाधव चषक कुस्ती व छ. शिवाजी चषक कबड्डी, भाई नेरुरकर खो-,खो स्पर्धा, व्हॉलीबॉल चषक स्पर्धा :

महाराष्ट्राची क्रीडा संस्कृती जोपासण्यासाठी व वाढ होण्यासाठी विविध खेळाच्या माध्यमातून युवा पिढीला खेळाकडे आकृष्ट करणे व त्यांच्यातील क्रीडा गुणांना वाव देण्यासाठी स्व. खाशाबा जाधव चषक कुस्ती स्पर्धा व छ. शिवाजी चषक कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. यामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या खेळाडू बरोबर खेळण्याची संधी तसेच जवळून कौशल्य पाहण्याची संधी राज्यतील खेळाडूंना मिळत आहे.

## २४. राज्याचे युवा धोरण २०१२

देशाचे युवा धोरण सन २००३ मध्ये जाहिर करण्यात आले आहे. राज्यतील १३ ते ३५ वयोगटातील युवा लोकसंख्येचा विचार करता देशाच्या युवा धोरणाच्या अनुषंगाने राज्यचे स्वतंत्र युवा धोरण तयार झाल्यास त्याव्दारे युवा कल्याणाच्या विविध योजना राबविणे शक्य होणार आहे. या पार्श्वभूमीवर एकंदरीतच राज्यच्या युवक कल्याण क्षेत्राचा आढावा घेऊन नवीन युवा धोरण ठरविण्याकरीता मा. मंत्री (क्रीडा व युवककल्याण) अध्यक्ष व मा. राज्यमंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांच्या उपाध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २० फेब्रुवारी २०१० च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. या समितीत २९ सदस्यांचां अंतर्भाव होता.

देशाचे युवा धोरण २००३ व त्यानतंर युवककल्याण क्षेत्रात झालेले विविध बदल विचारात घेऊन राज्यचे नवीन युवा धोरण ठरविण्याकरीता सहाय्यभूत होतील अशा सर्वकर्ष शिफारशी करणे अशी या समितीची कार्यकक्ष होती.

दि. १४ जुन २०१२ रोजी महाराष्ट्र राज्यचे युवा धोरण-२०१२ जाहीर झाले असुन, शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्या अनुषांगीक ६ योजनांचे शासन निर्णय प्राप्त झाले असून, त्या योजना खालील प्रमाणे आहेत.

**१. युवा वसतीगृहाची स्थापना -**

राज्याचे युवा धोरण-२०१२ अंतर्गत राज्यतील युवांना विविध उपक्रमामध्ये सहभागी होत असताना निवास ही समस्या न राहता त्यांना वसतीगृहे आधार देणारे ठिकाण असणे आवश्यक आहे. वसतीगृहाची सुविधा उपलब्ध झाल्यास युवा त्यांच्या कार्यावर लक्ष केंद्रित करुन प्रगतीच्या संधीचा योग्य फायदा घेतील या उद्देशाने शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.युकयो.२०१२/प्र.क्र.६६/क्रीयुसे-३ दिनांक २८ एप्रिल, २०१४ अन्वये राज्यत सहा महसुल विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी रु.४.०० कोटी अनुदानाच्या मयादेत १०० युवक, युवतीच्या निवास व्यवस्थेसाठी युवा वसतिगृह उभारण्यात येणार आहेत.

**२. युवा महोत्सवाचे आयोजन -**

राज्याचे युवा धोरण २०१२ अंतर्गत राज्यची संस्कृती व परंपरा जतन करण्यासाठी तसेच राष्ट्रीय एकात्मता व युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी राज्यतील १३ ते ३५ वयोगटातील युवकांसाठी शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.युकयो-२०११२/प्र.क्र.६७/क्रीयुसे-३ दि.६ जानेवारी, २०१४ अन्वये जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये युवा महोत्सवामध्ये लोकनृत्य, लोकगीत, एकांकिका (इंग्रजी व हिंदी) शास्त्रीय गायन (हिंदुस्थानी),शास्त्रीय नृत्य,सितार,बासरी, तबला, विणा,मृदूंग, हार्मोनियम, मिटार, मणीपुरी नृत्य, ओडिसी नृत्य, भरतनाटयम, कथ्यक, कुचिपुडी नृत्य, व वक्तृत्व या प्रकारच्या स्पर्धात्मक बाबीमध्ये तर राज्यच्या संस्कृतिचे दर्शन घडविणा-या दोन कार्यक्रमाध्ये स्पर्धा घेवून यातील पात्र युवकांना राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये राज्यचा प्रतिनिधीक संघ सहभागी करण्यात येणार आहे.

## २. युवा नेतृत्व व व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण व इतर युवक कल्याणकारी कार्यक्रम -

राज्याचे युवा धोरण-२०१२ अंतर्गत राज्यतील युवक कल्याण क्षेत्रात परिणामकारक बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने युवकांना जीवनात ध्येय निश्चित करण्यास मदत करण्यासाठी व ते गाठण्यासाठी प्रेरीत करण्याकरिता युवकांमधील नेतृत्व व व्यक्तिमत्वाचा विकास घडवून आणण्याकरीता त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.युकयो.२०१३/प्र.क्र.८/क्रीयुसे-३ दिनांक २८ एप्रिल, २०१४ अन्वये राज्यत प्रतिवर्षी यशदा सारख्या शासकीय संस्था मार्फत ६ शिबीरांचे आयोजन करण्यात येणार आहे. प्रत्येक शिबीरामध्ये राज्यतील ३५ जिल्हयातून जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त केलेल्या एका युवक व युवतीस पाचारण करण्यात येणार आहे. सदर ७० युवकांना त्यांच्या नेतृत्व गुणांचा व व्यक्तिमत्वाचा विकास घडवून आणणेसाठी १५ दिवसांच्या निवासी प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे.

## ४. राज्य युवा विकास निधीस अनुदान -

राज्याचे युवा धोरण २०१२ अंतर्गत युवकांना व युवा क्षेत्रात काम करणा-या संस्थांना युवक कल्याण विषयक उपक्रमांना सहाय्यक करणेसाठी शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.युकयो. २०१३/ प्र.क्र.६६/क्रीयुसे-१ दि.१९ डिसेंबर २०१३ अन्वये राज्ययुवा विकास निधी ची स्थापना केलेली आहे. यामधून राज्यतील युवक, युवती व संस्थांना युवा कल्याणकारी उपक्रम, युवक कल्याण क्षेत्रात संशोधन, युवकांना शिष्यवृत्ती/फेलोशिप, युवांच्या सक्षमीकरणाकरीता उपक्रम, युवा विकासासंबंधी साहित्य निर्मिती, युवांच्या समस्या व त्यावरील उपाययोजना शोधण्याकरीता सर्वेक्षण, युवांसाठी चर्चासत्रे, कार्यशाळा, शिबीर, उदद्बोधन वर्ग आयोजित करणे इ.साठी अर्थसहाय्य करण्यात येते.

## ५. राज्य युवा प्रशिक्षण केंद्रांची स्थापना –

राज्याचे युवा धोरण-२०१२ अंतर्गत राज्यतील युवांच्या सक्षमीकरणाकरीता शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.युकयो.२०१२/प्र.क्र.६३/क्रीयुसे-३ दि.१२ नोव्हेंबर,२०१३ अन्वये राज्ययुवा प्रशिक्षण केंद्र शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी,पुणे येथे सुरु केलेले आहे. हे केंद्र युवांच्या गरजा ओळखून त्या गरजांच्या पुर्ततेकरीता शिका, नेतृत्व करा, व योगदान द्या. या सिध्दांतानुसार कार्यरत रहाणार असून शिक्षण, युवा सक्षमीकरणाकरीता विविध प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, सेमीनार इ.चे आयोजन तसेच सल्ला व सहाय्य या बाबींवर लक्ष केंद्रित करणार आहे. सदर केंद्रमार्फत विविध विषयांचे १० व ३० दिवसांचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविण्यात येतील. केंद्रमार्फत युवक कल्याण क्षेत्रात नवनविन संकल्पना राबविण्याकरीता नियमित संशोधन कार्य करण्यात येईल. संशोधन कार्य करण्याकरीता तज्ञ व्यक्ती/संस्थेस दरवर्षी आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

## ६. युवा पुरस्कार –

राज्याचे युवा धोरण-२०१२ अंतर्गत राज्यतील व जिल्हयातील युवांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा व युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.युकयो.२०१२/प्र.क्र.६५/क्रीयुसे-३ दिनांक १२ नोव्हेंबर,२०१३ अन्वये प्रतिवर्षी जिल्हा व राज्यस्तरावर एक युवक, एक युवती व एका संस्थेस युवा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरुप जिल्हास्तरावर युवक व युवतीस रोख रुपये १०,०००/- संस्थेस रुपये ५०,०००/- तसेच गौरवपत्र, सन्मानचिन्ह असे असेल तर पुरस्काराचे स्वरुप राज्यस्तरावर युवक व युवतीस रोख रुपये.५०,०००/- संस्थेस रुपये १,००,०००/- तसेच गौरव पत्र, सन्मानचिन्ह असे असणार आहे.

## २५. राज्याचे क्रीडा धोरण २०११.

देशात क्रीडा धोरण जाहिर करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्यआहे. खेळाडू हा केंद्रबिंदू मानून सन १९९६ मध्ये सर्वप्रथम क्रीडा धोरण तयार करण्यात आले. या क्रीडा धोरणाचा कालावधी सन २००० पर्यंत निश्चित करण्यात आला होता.

- सन १९९६ मधील क्रीडा धोरणाची फलश्रृती व क्रीडा विकासाची दिशा लक्षत घेऊन नवीन क्रीडा धोरण सन २००१ मध्ये जाहिर करण्यात आले.

सन २००१ च्या क्रीडा धोरणात '**सर्वांसाठी खेळाव्दारे सदृढता**' हा केंद्रबिंदू ठरविण्यात आला असून आबालवृध्द नागरिकांमध्ये शारीरिक सुदृढता आणि याव्दारे आरोग्यसंपन्न कार्यक्षम जीवनाचे महत्व त्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना या क्रीडा धोरणात सुचविण्यात आली आहे.

- राज्यचे क्रीडा धोरण ठरविण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. क्र.क्रीडाधो-२००६/प्र.क्र.१६७/०६/क्रीयुसे-१, दि.२० फेब्रु. २०१० अन्वये, मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या समितीत ४५ सदस्यांचा अंतर्भाव होता.

क्रीडा धोरणांमधिल ५८ महत्वपूर्ण शिफारसी केलेल्या आहेत. दि.२० एप्रिल,१२ रोजी शासनाने क्रीडा धोरण २०१२ मान्यता दिलेली होती.

- दि. १४ जुन २०१२ रोजी महाराष्ट्र राज्यचे क्रीडा धोरण २०१२ जाहीर झाले असून शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्या अनुषांगीक ८ योजनांचे शासन निर्णय प्राप्त झाले असून ते खालील प्रमाणे आहेत.

### १. राज्यातील आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख बक्षिस देवून गौरविण्याची योजना.

राज्याचे क्रीडा धोरण २०१२ च्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.राक्रीधो -२०१२/ प्र. क्र.१५८/ १२ / क्रीयुसे-२, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१४ अन्वये राज्यतील आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख बक्षिस देवून गौरविण्याची योजना कार्यन्वित करण्यास शासनाने मान्यता व मंजूरी दिलेली आहे.

महाराष्ट्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक प्राप्त करणा-या खेळाडूंना तसेच त्यांचे क्रीडा मार्गदर्शक / प्रशिक्षक यांना रोख पारिताषिके देवून गौरव करण्याबाबत राज्यतील उल्लेखनिय कामगिरी करणा-या खेळाडूंना राज्यशासनातर्फे यापुर्वी वेळो-वेळी रोख पारितोषिके देवून गौरविण्यात आलेले आहे.
तसेच राज्यतील आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनिय कामगिरी करुन राज्यचे नाव उज्वल केलेल्या राज्यतील खेळाडूंना व त्यांच्या मार्दर्शक / प्रशिक्षकांना, आलिंम्पिक, विश्व अजिंक्यपद, एशियनगेम्स, राष्ट्रकुल, युवा राष्ट्रकुल, एशियन चॅम्पियनशीप, युथ ऑलिम्पिक / ज्युनियर एशियन / विश्व, अजिंक्यपद स्पर्धा / शालेय आशियाई स्पर्धा, पॅरा आलिम्पिक स्पर्धा व पॅरा एशियन स्पर्धा या स्पर्धां करीता रोख रकमेचे पारितोषीक देवून गौरविण्यात येते.

### २. तालिम कुस्ती केंद्रचा विकास करण्याबाबत-

राज्याचे क्रीडा धोरण २०१२ च्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.राक्रीधो -२०१२/प्र. क्र.२४४ /१२/क्रीयुसे १, दिनांक १ मार्च, २०१४ अन्वये तालिम कुस्ती केंद्रचा विकास करण्याबाबत ही योजना कार्यन्वित करण्यास शासनाने मान्यता व मंजूरी दिलेली आहे.
महाराष्ट्रात कुस्ती कलेची परंपरा जोपासण्यासाठी तालिम व आखाड्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. कुस्तींच्या तंत्रात झालेले बदल लक्षत घेऊन आखाडा / तालमीचे आधुनिकीकरण करणे गरजेचे असल्याची भावना राज्यतील कुस्ती पटूंनी वेळोवेळी व्यक्त केली आहे. जुन्या तालमींची दुरुस्ती / नुतनीकरण करण्यास

अंदाजित खर्चाच्या ७५ टक्के किंवा कमाल रुपये ७.०० लक्ष या पैकी जी कमी असेल इतके अर्थसहाय्य ७५.२५ (शासन व संस्था) या प्रमाणात अनुदान स्वरुपात एकरकमी देण्यात येईल, असे प्रस्तावित आहे.

**३. क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन.**

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन,प्रचार,प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून राज्याचे क्रीडा धोरण २०१२ घोषित करण्यात आलेले आहे. या क्रीडा धोरणातील मुद्दा क्र ६ (५) नुसार खेळामधील बदललेले आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षणाच्या पध्दती, नवीन खेळ, खेळांची शास्त्रोक्त माहिती वेळोवेळी शिक्षकांना होणे आवश्यक आहे. तालूका,जिल्हा,विभाग व राज्यस्तरावर क्रीडा शिक्षकांच्या ज्ञानात भर पडावी व वेळोवेळी क्रीडा क्षेत्रात होणारे बदल अवगत होण्यासाठी राज्यतील शालेय शिक्षण विद्यार्थ्यांना योग्य क्रीडा प्रशिक्षण मिळण्यासाठी क्रीडा शिक्षकांचे अद्यायावत प्रशिक्षण असणे आवश्यक आहे. या करीता प्रति वर्षी १० दिवसांचे राज्यस्तरावर मास्टर्स ट्रेनर व जिल्हास्तरीय शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यासाठी अद्यावत क्रीडा धोरण सन २०१२ तयार करण्यात येऊन त्याच्या अंमलबजावणीसाठी शासन निर्णय क्र. क्रीडाधो-२०१२/प्र.क्र.२५०/ १२/ क्रीयुसे-२, दि. २८/०४/२०१४ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

**४.राज्यस्तरावर क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन.**

राज्याचे क्रीडा संस्कृतीचे संवर्धन,प्रचार,प्रसार व जोपासना करण्यासाठी व प्रतिभावंत खेळाडू तयार करण्यासाठी शासन अनेक वर्षापासून प्रयत्नशील आहे. सन १९९६ मध्ये राज्यचे स्वतंत्र क्रीडा धोरण जाहीर करण्यात आले. त्यानंतर सन २००१ मध्ये सुधारीत धोरण निश्चित करण्यात आले त्याचा परिणाम म्हणजे महाराष्ट्राचे क्रीडा क्षेत्रात नावलौकीक झाले. दरम्यानच्या काळात क्रीडा क्षेत्रात झालेले बदल लक्षत घेऊन व आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक विजेते खेळाडू तयार होण्यासाठी अद्यावत क्रीडा धोरण सन २०१२ तयार करण्यात येऊन त्याच्या आंमलबजावणी साठी शासन निर्णय क्र. क्रीडाधो-२०१२/प्र.क्र.२३१/क्रीयूसे-१, दि.१३/०२/२०१४ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. या शासन निर्णयन्वये पुरुष व महिला गटातील संबधित अधिकृत संघटनेचे खेळाडू तसेच शालेय १७ व १९ या वयोगटातील मुले व मुली खेळाडूंना सहभागी करुन घेण्यात येणार आहे.

**५. राज्यातील क्रीडा सुविधांचे सर्वेक्षण करणे.**

महाराष्ट्र राज्यचे क्रीडा धोरण - २०१२ च्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.राक्रीधो-३११३/ प्र.क्र४६/ क्रीयुसे-३ दि.२६ फेब्रुवारी, २०१४ अन्वये, राज्यशासन, स्थानिक स्वराज्यसंस्था तसेच खाजगी संस्थामार्फत विकसित करण्यात आलेल्या क्रीडा सुविधांची माहिती संकलित करुन सर्वसामान्य जनतेस व खेळांडूंना उपलब्ध व्हावी तसेच जिथे क्रीडा सुविधा उपलब्ध नाहीत, तेथे नव्याने क्रीडा सुविधा उपलब्ध करणे या उद्देशाने क्रीडा विभागामार्फत सदर सुविधांचे सर्वेक्षण करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. यामध्ये जिल्हयातील स्थानिक स्वराज्यसंस्था, महसूल विभाग, शिक्षण विभाग, खाजगी संस्था यांचे सहकार्याने जिल्हानिहाय उपलब्ध सुविधांची माहिती संकलित करुन त्या माहितीच्या आधारे लोकप्रिय क्रीडा प्रकार, उपलब्ध सुविधा, खेळाडू संख्या, आवश्यकता इत्यादी बाबींचा विचार करुन क्रीडा सुविधा विकसित करण्याकरिता आराखडा तयार करणे.

**६. माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविदयालयांना खेळांचे प्रचलनासाठी प्रोत्साहनात्मक अनुदान —**

क्रीडा धोरण, २०१२ च्या मधील शासन निर्णय क्र. राक्रीधो-२०१२/प्र.क्र.२५९/क्रीयुसे-१ दि. २६ फेब्रुवारी, २०१४ अन्वये तालुका, जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत जास्तीत जास्त शाळांच्या मुलां/मुलींचा

सहभाग होण्याच्या दृष्टिकोनातून शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान मर्यादेत वाढ करण्याचा सुधारित निर्णय घेण्यात आलेला आहे.

क्रीडा विभागामार्फत तालुका, जिल्हा, विभाग, राज्यव राष्ट्रीय स्तर या क्रमाने शालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या योजनेमध्ये जिल्हास्तर १४, १७, १९ वयोगटातील मुले व मुलींच्या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेतील खेळ निहाय कामगिरीनुसार गुण प्रदान करण्यात येऊन त्यानुसार प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक दिले जातात. सदर शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान अनुक्रमे रु.१.०० लाख, रु.०.७५ लाख, ०.५० लाख दिले जातात. त्याचप्रमाणे राष्ट्रीय स्तर शालेय क्रीडा स्पर्धेत जास्तीत जास्त क्रीडा प्रकारात सहभागी होऊन पदक प्राप्त करणा-या राज्यतील सर्वोत्कृष्ट तीन शाळा रु.२.०० लक्ष, आणि आंतरराष्ट्रीय स्तर शालेय आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होऊन प्रथम तीन क्रमांका पर्यत प्राविण्य मिळविणा-या खेळाडू विद्यार्थ्यांच्या शाळेस रु.७.०० लाख व ४ ते १० क्र.पर्यतचे पदक विजेते खेळाडू तयार करणा-या शाळांना रु.३.०० लक्ष. दिले जाणार आहे. याप्रकारे प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांच्या शाळांना मंजूर झालेल्या अनुदानातून पुढील बाबींवर खर्च करणे बंधनकारक राहील, उदा. क्रीडांगणाची देखभाल व दुरुस्ती, क्रीडा साहित्याची खरेदी, क्रीडा वाङ्मय पुस्तके, नियतकालिके यांची खरेदी, क्रीडाविषयक ध्वनीचित्रफितीची खरेदी, खेळाडूंचे प्रशिक्षण व प्रशिक्षकांचे मानधन, संबंधित खेळाडूंना गणवेश व रोख पारितोषिक इ.

### ७. क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी आर्थिक सहाय योजना —

राज्याचे क्रीडा धोरण २०१२, च्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.राक्रीधो-२०१२/प्र.क्र.२६०/क्रीयुसे-१ दि.१ मार्च, २०१४ अन्वये क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य ही योजना कार्यान्वित करण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे.

सदर योजनेअंतर्गत अदयावत क्रीडा सुविधा निर्मिती व क्रीडा साहित्य अनुदान याकरिता खाजगी / शासनाच्या मार्फत चालविण्यात येणा-या व राज्यशासनाच्या संबंधित विभागाने दिलेल्या मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविदयालय, वरिष्ठ महाविदयालय, कृषी महाविदयालय, तंत्र शिक्षण व वैदयकीय महाविदयालय इत्यादी, स्थानिक स्वराज्यसंस्थेमार्फत चालविण्यात येणा-या प्राथमिक / माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविदयालय, विविध खेळांच्या विकासासाठी कार्यरत असणा-या सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० किंवा संस्था नोंदणी अधिनियम -१८६० अन्वये पंजीबध्द असतील अशा व्यायाम संस्था, क्रीडा मंडळे, एकविध खेळाच्या क्रीडा संघटना, युवा मंडळे व महिला मंडळे, स्थानिक स्वराज्यसंस्था, ग्रॅपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषद, आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येणा-या आश्रमशाळा, राज्यशासनाच्या वतीने विकसित करण्यात आलेली विभाग, जिल्हा, तालुका व ग्रॅ क्रीडा संकुले यांना ७५ : २५ शासन व संस्था हिस्सा या प्रमाणात अनुदान देण्यात येते.

### ८. शैक्षणिक संस्थाना मानधनावर क्रीडा मार्गदर्शक नियुक्तीस मान्यता देणेबाबत.

राज्याचे क्रीडा धोरण २०१२ च्या अनुषंगाने शासन निर्णय क्र. राक्रीधो-२०१२/प्र.क्र.१७९/ १२/क्रीयुसे-२,दिनांक २८ एप्रिल २०१४ अन्वये शैक्षणिक संस्थानां मानधनावर क्रीडा मार्गदर्शक नियुक्तीस मान्यता देण्याबाबत हि योजना कार्यान्वीत करण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे.

शाळांमध्ये क्रीडा संस्कृती रुजविण्यासाठी शाळांच्या नियमित वेळापत्रका व्यतिरिक्त शाळा सुरु होण्यापूर्वी व शाळा सुटल्यानतंर सकाळी व संध्याकाळी तसेच सुटटीच्या कालावधी मध्ये क्रीडा प्रशिक्षण देण्यासाठी मानधन तत्वावर क्रीडा मार्गदर्शकांची नियुक्ती देऊन क्रीडा मार्गदर्शकानां रु.५०००/- दरमहा मानधन तत्वावर नियुक्ती देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**९. आंतरराष्ट्रीय खेळाडूनां प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, मार्गदर्शकांचे शुल्क इ. आर्थिक मदत करणे.**

राज्याचे क्रीडा धोरण २०१२ च्या अनुषंगाने शासन निर्णय क्र. क्रीडाधो-३११३/प्र.क्र.२९/क्रीयुसे-३, दिनांक २८ एप्रिल २०१४ अन्वये अधिकृत आतंरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तसेच सहभागी झालेल्या होतकरु खेळाडूनां प्रशिक्षण व इतर बाबींसाठी आर्थिक सहाय्य देण्याबाबत ही योजना कार्यान्वीत करण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे.

सदर योजनेतंर्गत अधिकृत आतंरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्या-या खेळाडूनां स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १. प्रवास खर्च, प्रवेश शुल्क, निवास व भोजन २. देश विदेशातील स्पर्धापूर्व प्रशिक्षण, प्रशिक्षण उपकरणे, तज्ञ क्रीडा मार्गदर्शकांचे मार्गदर्शन शुल्क, प्रशिक्षण कार्यक्रम शुल्क. ३.आधुनिक क्रीडा साहित्य आयात/ खरेदी करणे, गणवेश इ. बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

**१०.क्रीडा शिक्षकानां प्रोत्साहित करण्यासाठी पुरस्कार देणे.**

राज्याचे क्रीडा धोरण २०१२ च्या अनुषंगाने शासन निर्णय क्र. क्रीडाधो-३११३/प्र.क्र.३०/१३/ क्रीयुसे-३, दिनांक २८ एप्रिल २०१४ अन्वये क्रीडा शिक्षकानां प्रोत्साहित करण्यासाठी पुरस्कार देण्याबाबत ही योजना कार्यान्वीत करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

सदर योजनेतंर्गत दिनांक १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या गत तीन वर्षाची कामगिरी विचारात घेण्यात येते. यामध्ये गुणवंत क्रीडा शिक्षकांसाठी एक महिला व एक पुरुष यांचा समावेश असून राज्यस्तरावर ८ विभागांसाठी १२ पुरस्कार दिले जातात. तसेच जिल्हास्तरावर ७० पुरस्कार दिले जातात. यात राज्यस्तर- गौरव, सन्मानचिन्ह व रोख रु.५०,०००/- जिल्हास्तर- गौरव,सन्मानचिन्ह व रोख रु.१०,०००/- याप्रमाणे पुरस्कार देण्यात येणार आहे.

**११. शालेय क्रीडा स्पर्धा.**

राज्याचे क्रीडा धोरण २०१२ च्या अनुषंगाने शासन निर्णय क्र. राक्रीधो-२०१२/प्र.क्र.१८२/क्रीयुसे-२, दिनांक २४ डिसेंबर २०१४ अन्वये शालेय क्रीडा स्पर्धा आयोजन करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

सदर योजनेतंर्गत तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तर तसेच भारतीय शालेय खेळ महासंघाव्दारे निवड होणा-या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. यात खेळाडूनां गणवेश,ट्रॅकसूट, हातखर्ची भत्ता, प्रवास खर्च, निवास व भोजन खर्च, अल्पोपहार भत्ता या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

# खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी पाच टक्के आरक्षण

खेळाडूंचे खेळतील करीअरचा व शैक्षणिक करीअरचा काळ एकत्र असल्याने त्यांना दोन्ही आघाडीवर सारख्याच प्रमाणात लक्ष देता येणे शक्य नसते, त्यामुळे बऱ्याचदा खेळाडूंची शैक्षणीक क्षेत्रात पिछेहाट होते व त्यामुळे नोकरी व्यवसायाच्या स्पर्धेत ते केवळ शैक्षणीक करीयर करणाऱ्या विद्यार्थ्यांशी स्पर्धा करु शकत नाहीत, खेळाचा उमेदीचा काळ संपल्यानंतर अशा गुणवत्ताधारक खेळाडूंना नोकरीसाठी वणवण भटकावे लागते, यामुळे अथवा त्यांचे पालक खेळाकडे करीअर म्हणून पाहत नाहीत व खेळास पूर्णवेळ योगदान देण्यापासून परावृत्त होतात. राज्याचे नाव उज्वल करणाऱ्या खेळाडूंना उदरनिर्वाहाची खात्री मिळाल्यास ते खेळातील प्राविण्य निश्चितपणे वाढवतील म्हणून शासन निर्णय क्र. राक्रीधो–२००२/प्र.क्र. ६८ / क्रीयेसु–२, दि. ३० एप्रिल २००५ अन्वये अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय, निमशासकीय कार्यालयामधील गट–अ, ब, क व ड संवर्गामधील सरळ सेवेने भरण्यात येणाऱ्या पदांना हे लागू राहील.

| **आरक्षण लागू असलेल्या सेवा व कार्यालये** | **आरक्षण लागू नसलेल्या सेवा व कार्यालये** |
|---|---|
| १) राज्य शासनाची सर्व कार्यालये<br>२) राज्य शासनाचे उपक्रम<br>३) स्थानिक स्वराज्य संस्था<br>४) वैद्यकीय मंडळे<br>५) राज्य शासनाकडून किंवा अप्रत्यक्ष ( उदा. जमीन, पाणी, अनुदान, कर सवलती इ. ) प्राप्त होणाऱ्या संस्था | १) उच्चन्यायालय<br>२) न्याधिकरणे<br>३) राज्यपालाचे सचिवालय<br>४) महाराष्ट्र लोकसेवा आयोग<br>५) लोक आयुक्त, महाराष्ट्र |

**नियुक्तिसाठी खेळाडूंची अर्हता :-**

१) खेळाडू हा महाराष्ट्राचा रहिवाशी असाव व त्याला मराठीचे ज्ञान असावे.

२) सदर खेळाडूने सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार पदासाठी आवश्यक असलेली किमान शैक्षणिक व इतर अर्हता प्राप्त केलेली असावी.

३) खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन, वयोमर्यादित पाच वर्षांपर्यंत अट शिथील.

४) एखाद्या खेळाडूने राज्याचे नाव उज्वल होईल अशी कामगिरी केल्याचे निर्दनास आल्यास, शैक्षणिक व वयाची अट शिथील करुन, अशा खेळाडूस योग्य अशा पदी नियुक्त करण्याचे अधिकार शासनास राहतील.

**क्रीडा विषयक अर्हता :-**

गट "अ" पदासाठी – आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धेत भारतातर्फे प्रतिनिधीत्व करताना प्रथम, व्दितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा खेळाडू.

गट "ब" पदासाठी – त्या त्या खेळाच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धेमध्ये भारतातर्फे प्रतिनिधीत्व करताना राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, व्दितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा खेळाडू.

गट "क" व "ड"पदासाठी – वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, व्दितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त खेळाडू, तसेच राष्ट्रीय छात्र सेनेमध्ये अंडर ऑफीसरची रँक मिळवून राष्ट्रीय छात्रसेनेच्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती.

आरक्षणासाठी मान्यता प्राप्त क्रीडा प्रकार : विविध गटासाठी भारतीय ऑलिम्पिक महासंघ व महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटना यांनी मान्यता दिलेले खेळ.

राज्याचे क्रीडा धोरण २०१२
क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक
सहाय्य

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक – २०१२ / प्र.क्र. २६०/ क्रीयुसे – १,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ४०० ०३२
मादम कामा मार्ग, हुतात्मा चौक,
तरीख : १ मार्च २०१४

प्रस्तावना :-

राज्य क्रीडा क्षेत्रात अग्रगण्य रहावे, नागरिकांना व्यायामाची आवड जोपासावी, राज्यातील खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करण्यासाठी क्रीडा विषयक तंत्रशुध्द प्रशिक्षण, खेळाच्या दर्जात सुधारणा, खेळाडूंचा गौरव, दर्जेदार क्रीडा सुविधा याबाबी केंद्र शासनाने खेळाडू तयार होण्यासाठी अद्यावत क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी जी योजना ५०:५० या तत्वावर सुरु केली होती ती २००५ – २००६ पासून बंद करण्यात आली असल्याने खाजगी / स्थानिक स्वराज्य संस्था ज्यांच्याकडे स्वत:चे मैदान व अल्प आर्थिक तरतूद आहे त्यांना क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी येणाती अडचण, तसेच वाढत्या शहरीकरणामुळे विद्यार्थ्यांना व तरुणांना व्यायामासाठी व खेळासाठी मिळणारा अल्प वेळ त्या अनुषंगाने किमान अंतरावर खेळ व व्यायाम सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी बाब लक्षात घेऊ ७५:२५ शासन व संस्था हिस्सा या प्रमाणात योजना राबविण्याची शिफारस आहे. त्या अनुषंगाने क्रीडा सुविधा निर्मितीस साहित्यासाठी अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :- या योजनेस “क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी आर्थिक सहाय्य” असे संबोधले जावे.

१) योजनेचे उद्दिष्ट :- राज्यातील शैक्षणिक संस्था, खाजगी क्लब, क्रीडा मंडळे, प्रधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था यामधून दर्जेदार क्रीडा सुविधा निर्माण करणे, त्यामुळे खेळाडूंच्या कामगीरीत वाढ होऊन आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडू निर्माण होण्यास मदत होईल.

२) योजनेचे स्वरुप :- क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य तपशिल प्रपत्र “अ” मध्ये क्रीडा साहित्यासाठी आर्थिक सहाय्य व मर्यादा याचा तपशिल प्रपत्र “ब” मध्ये दर्शविला आहे.

३) अनुदानासाठी पात्र संस्था :- अद्यावत क्रीडा सुविधा निर्मिती, क्रीडा साहित्य खालील नमूद केलेल्या विविध संस्थांना पात्र समजण्यात येईल.

अ) खाजगी / शासनाच्या मार्फत चालविण्यात येणाऱ्या व राज्यशासनाच्या संबंधीत विभागाने दिलेल्या मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा, कनिष्ठमहाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय, कृषि महाविद्यालय, तंत्र शिक्षण व वैद्यकीय महाविद्यालय इत्यादी.

ब) स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या प्राथमिक / माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय.

क) विविध खेळाच्या विकासासाठी कार्यरत असणाऱ्या व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम – १९५० किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये पंजीबध्द असतील अशा व्यायाम संस्था, क्रीडा मंडळे, एकविध खेळाच्या संघटना, युवा मंडळे व महिला मंडळे.

ड) स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हापरिषद.

इ) आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या आश्रमाशाळा.

ई) राज्य शासनाच्या वतीने विकसित करण्यात आलेली विभाग, जिल्हा, तालुका व ग्राम क्रीडा संकुल.

नोट :- नियम व अटीसाठी व अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# प्रपत्र – अ
## क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य व मर्यादा

| अ.क्र. | प्रकल्पाचा प्रकार | अपेक्षित अंदाजित खर्च | राज्य शासन अनुदान मर्यादा | संस्थेचा हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १ | क्रिडांगण विकसित करणे. | | | |
| | फूटबॉल / क्रीकेट हॉकी या खेळाची प्रमाणित आकाराची मैदाने. (त्या त्या खेळाची गोलपोस्टसह) | १०.०० | ७.५० | २.५० |
| | प्रमाणित आकाराचे आठ लेन्सच्या धावनपथासह ग्रास / सिंडर ट्रॅक | २०.०० | १५.०० | ५.०० |
| | प्रमाणित आकाराचे सिमेंट कॉंक्रिट बास्केटबॉल कोर्ट (पोस्ट व बोर्डसह) | १०.०० | ७.५० | २.५० |
| | प्रमाणित आकाराचे (मुरुम) टेनिस कोर्ट | १०.०० | ७.५० | २.५० |
| २ | बंदिस्त प्रेक्षाग्रह | | | |
| | ४० x २५ x १२.५ मी आकारापेक्षा कमी नसलेले चेंजींग रुम्स व स्वच्छतागृह व प्रसाधनगृहासह | १२०.०० | ९०.०० | ३०.०० |
| | ३५ x १९ x १२.५ मी आकारापेक्षा कमी नसलेले (वुडन / सिंथेटिक फ्लोअरिंग) | ९०.०० | ६७.५० | २२.५० |
| | १७ x १७ x ७ मी आकारापेक्षा कमी नसलेले वुडन / सिंथेटिक फ्लोअरिंगसह) | ४०.०० | ३०.०० | १०.०० |
| ३ | क्रीडा सुविधा | | | |
| | १८० x १०० मी. मैदानी आणि आठ लेन्सच्या धावनपथ, चेंजीग रुम्स व प्रसाधनगृह | ३६.०० | २७.०० | ९.०० |
| | १८० x १०० मी आकारापेक्षा कमी नसलेले मैदान ग्रास / सिंडर सहा लेन्सच्या धावनपथ, चेंजींग रुम्स व प्रसाधनगृह | ३०.०० | २२.५० | ४.५ |
| | जलक्रीडा सुविधा, साहसी खेळांची सुविधा व साहित्य जलतरण तलावाव्यतिरिक्त (बोट हाऊस, जे.टी.ई. व क्लाइंबिंग वॉल) | ५०.०० | ३७.५० | १२.५० |
| | स्केटींग रिंक (आऊट डोअर) सिमेंट कॉंक्रीट फ्लोअरिंग आकार ४० x २० मी. / बॅडमिंटन, टेनिस, व्हॉलीबॉल वुडन / सिंथेटिक फ्लोअरिंग | १०.०० | ७.५० | २.५० |
| | वेलोड्रम (प्रमाणित आकाराचा) | ५०.०० | ३७.५० | १२.५० |
| | शुटींग रेंज | ५०.०० | ३७.५० | १२.५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | अस्ट्रोटर्फ हॉकी क्रीडांगण | | ७५.०० | ५६.२५ | १८.७५ |
| | लॉन टेनिस (सिंथेटिक) | | २०.०० | १५.०० | ५.०० |
| | जलतरण तलाव | | | | |
| | (अ) ५० x २१ मी जलशुध्दीकरण सयंत्रणासह | | १२०.०० | ९०.०० | ३०.०० |
| | (ब) २५ x २१ मी जलशुध्दीकरण सयंत्रणासह | | | | |
| | (क) २५ x १३ मी जलशुध्दीकरण सयंत्रणासह | | ६०.०० | ४५.०० | १५.०० |
| | जलतरण तलाव ही बाब क्रीडा धोरणात क्र. ४.७ (अ) मध्ये मंजुर आहे. क्रीडा सुविधेत एकसुत्रता आणण्यासाठी सदर बाबीचा याठिकाणी समावेश करण्यात आला आहे. | | ५०.०० | ३७.५० | १२.५० |
| **अ.क्र.** | **क्रीडा प्रकार** | **क्रीडा साहित्य** | **अपेक्षित अंदाजित खर्च** | **राज्यशासन अनुदान मर्यादा** | **संस्थेचा हिस्सा २५ %** |
| १ | अथलेटिक्स | थाळी, गोळा, भाला, अथलेटिक्स मार्किंग, कोन्स, स्टार्टींग बॉक्स, रिले बॅटन, हर्डल्स, हायजंप्स व पोलवॉल्ट क्रॉस बार, लांब, उंच उडी, पोलवॉल्ट क्रॉस बार, लांब, उडी, पोलवॉल्ट ऐक ऑफ बोर्ड हायजंप्स व पोलवॉल्ट पिट, गोळा टो बोर्ड, हर्डल्स स्टार्टर रोर्स्टम, स्पाईक | | | |
| २ | फूटबॉल | फूटबॉल, गोलकिपर ग्लोव्हज, कोन, फूटबॉल नेट, किकिंग बोर्ड, गोल पोस्ट, कॉर्नर फ्लॅग | ४.०० | ३.०० | १.०० |
| ३ | हॉकी | हॉकी गोलकिपर किट, हॅन्ड ग्लोव्हज, हॉकी टर्फ बॉल, गोल पोस्ट सेट, स्टीक केस, स्टीक यु ब्लेड कार्बन, फायबर ग्लास, हिटींग बोर्ड, कोन, शिनगार्डस. | | | |
| ४ | टेनिस | टेनिस बॉल, टेनिस नेट, लॉन टेनिस पोल (स्लिवससहित) | १.०० | ०.७५ | ०.२५ |
| ५ | बॅडमिंटन | बॅडमिंटन नेट, बॅडमिंटन बॉल | ५.०० | ३.७५ | १.२५ |
| ६ | वेटलिफ्टिंग, पॉवरलिफ्टिंग | बॅडमिंटन नेट, बॅडमिंटन पोल, वेटलिफ्टिंग प्लॅटफॉर्म | ४.०० | ३.७५ | १.०० |
| ७ | कुस्ती | कुस्ती मॅट (१२ १२ मी. सेट सिंथेटिक कव्हरसह) / डमीज | १.०० | ०.७५ | ०.२५ |
| ८ | व्हॉलीबॉल | व्हॉलीबॉल नेट, व्हॉलीबॉल पोल, अटीना फायबर ग्लास | ०.७५ | ०.५६ | ०.१९ |
| ९ | खो – खो | पोल (टीकवूड) १ जोडी | ०.२५ | ०.१८ | ०.०६ |
| १० | बॉक्सींग | ग्लोव्हज टेन ऑन्स रेड ब्ल्यू, पंचींग बॅग, हेड गियर रेड ब्ल्यू, पंचींग ग्लोव्हज, बॉक्सींग रींग | ४.०० | ३.०० | १.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | रस्सीखेच | १.५ " रस्सी | ०.२५ | ०.१८ | ०.०६ |
| १२ | हॅण्डबॉल | हॅण्डबॉल, गोलपोस्ट, नेट | १.०० | ०.७५ | ०.२५ |
| १३ | जलतरण | पाम पुरल, किक बोर्ड, पुल बॉय, लाईफ जॅकिट, बॅरल फ्लोट, आर्म फ्लोट लेन, लाईफ बॉय, फ्लोट लेन, डायव्हिंग बोर्ड, डायव्हिंग बोर्ड स्टॅन्ड | ५.०० | ३.७५ | १.२५ |
| १४ | जिम्नॅस्टिक्स | बॅलंसिंग बिम, अनइव्हन बार, ह~इरिझॉन्टल बार, पॉमेल हॉर्स, पॅरलल बार, रोम रिंग, व्हॉल्टिंग टेबर, जिम्नॅस्टिक्स बॅचेस, बीट बोर्ड, फाईव्ह स्प्रिंग्ज, स्पॉटींग बेल्ट, फ्लोअर प्लेट, मुशरुम हॉर्स, स्पेअर पॉमेल, ट्रॅम्पोलिन, फ्लोअर एस्करसाईज मॅट, रिदमिक साहित्य (रोप, वॉल, रिबन क्लब) | | | |
| १५ | कबड्डी | सिंथेटिक मॅट्स | ४.०० | ३.०० | १.०० |
| १६ | बास्केटबॉल | बास्केटबॉल, नेट, पोल | ४.०० | ३.०० | १.०० |
| १७ | टेबलटेनिस | टेबल, रोबो (Multy Program) | १.०० | ०.७५ | ०.२५ |
| १८ | ज्युदो, तायक्कांदो, कराटे | मॅटस | ४.०० | ३.०० | १.०० |
| १९ | मल्लखांब व रोप मल्लखांब | पोल, रोप, रोप मल्लखांब स्टॅन्ड | १.०० | ०.७५ | ०.२५ |
| २० | शुटींग | इलेक्ट्रॉनिक पुली, टारगेट, एअर रायफल, एअर पिस्तुल, लाईट स्टॅंड, रायफल स्टॅंड, पॅलेट | १०.०० | ७.५० | २.५० |
| २१ | टेनिस / क्रिकेट | टेनिस रोबो मशीन / क्रिकेट बॉलिंग मशीन | ५.०० | ३.७५ | १.२५ |
| २२ | मल्टिजीम / ट्रेडमिल / सायकलिंग / अद्ययावत व्यायाम साहित्य | १ स्टेशन, ४ स्टेशन, ६ स्टेशन, १० स्टेशन, १२ स्टेशन, १६ स्टेशन, मल्टिजीम. तसेच आधुनिक अद्ययावत व्यायाम साहित्य. | ७.०० | ५.२५ | १.७५ |

# जिल्हा क्रीडा पुरस्कार

जिल्ह्यातील उत्कृष्ट क्रीडापटू, गुणवंत क्रीडा मार्गदर्शक व गुणवंत क्रीडा कार्यकर्ता यांच्या कार्याचे / योगदानाचे मुल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा या उद्देशाने महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण, २००१ अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालयातर्फे जिल्हा क्रीडा पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय घेतला आहे. दरवर्षी प्रत्येक जिल्ह्यात जास्तीत जास्त चार पुरस्कार देण्यात येतील. यात गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, गुणवंत क्रीडा कार्यकर्ता पुरस्कार व गुणवंत खेळाडू पुरस्कार दिला जाईल. प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह व रोख रक्कम रु. १०,०००/- असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

१) सदर पुरस्कारासाठी १ जून ते ३० जुलै या कालावधितील गत तीन वर्षांची कामगिरी विचारात घेतली जाईल. पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराचे त्या जिल्ह्यात सलग १० वर्षे वास्तव्य असावे.

२) संबंधित जिल्ह्यामध्ये –

अ) गुणवंत क्रीडा मार्गदर्शक म्हणून सतत ५ वर्षे या जिल्ह्यात क्रीडा मार्गदर्शकाचे कार्य असले पाहिजे.

ब) क्रीडा संघटक / कार्यकर्त्याने सलग ५ वर्षे त्या जिल्ह्यात क्रीडा विकासासाठी भरीव योगदान दिले असले पाहिजे.

३) एका जिल्ह्यामध्ये जिल्हा क्रीडा पुरस्कार प्राप्त करणाऱ्या व्यक्ति राज्यातील अन्य जिल्ह्यात जिल्हा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही.

४) एकदा एका खेळामध्ये किंवा एका वर्गामध्ये जिल्हा पुरस्कार प्राप्त केलेली व्यक्ती पुन्हा त्याच खेळात किंवा प्रवर्गात जिल्हा क्रीडा पुरस्कार मिळण्यासाठी पात्र असणार नाही.

अ) राज्यस्तर व जिल्हास्तर युवा पुरस्कार :-

राज्यातील / जिल्ह्यातील युवांनी केलेले समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा व युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्य व जिल्हास्तरावर युवा पुरस्कार प्रतिवर्षी देण्यास खाली नमूद विहीत केलेल्या तरतूदीनूसार शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) पुरस्काराचे स्वरुप :-

* जिल्हा युवा पुरस्कार जिल्हास्तरावर एक युवक, एक युवती तसेच एक नोंदणीकृत संस्था यांना देण्यात येईल, सदरचा पुरस्कार गौरवपत्र, सन्मानचिन्हं, रोख रक्कम – रु. १० हजार ( प्रति युवक व युवतींसाठी ), प्रति संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्हं, रोख रक्कम – रु. ५० हजार, अशा स्वरुपाचा असेल.
* राज्यस्तरावर युवा पुरस्कार क्रीडा विभागाचे क्षेत्रिय विभागानुसार प्रत्येक विभागातील एक युवक, एक युवती एक नोंदणीकृत संस्था यांना देण्यात येईल. सदरच्या पुरस्काराचे स्वरुप गौरवपत्र, सन्मानचिन्हं, रोख रक्कम – रु. ५० हजार व संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्हं, रोख पुरस्कार रु. १.०० लक्ष असेल.

सर्व क्रीडा विकास योजनांबाबत, क्रीडा पुरस्काराबाबत
अधिक माहिती करिता व विहित नमुन्यातील अर्जासाठी
जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,
२ रा मजला, जिल्हा क्रीडा संकुल इमारत, धारावी बस डेपो शेजारी,
धारावी – सायन (प), मुंबई – ४०००१७
( दूरध्वनी क्र. : ८६५००३२३७३ )
जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहर, मार्फत राबविण्यात येणाऱ्या
क्रीडा व युवक कल्याण विषयक योजनांची तसेच क्रीडा – स्पर्धाविषयक
माहिती अर्जाचे नमुने व अध्ययावत अदान – प्रदान करणे करीता
dsomumbaicity@gmail.com चा वापर करावा.
तसेच कार्यालयाची सविस्तर माहिती www.mumbaidivsports.com ही वेबसाईट नेहमी पहावी

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहर, येथील कार्यरत अधिकारी कर्मचारी

| अ.क्र. | नांव | पदनाम | संपर्क क्र. |
|---|---|---|---|
| १. | श्री. अभय चव्हाण | जिल्हा क्रीडा अधिकारी | ०२२-६५५३२३७३ |
| २. | श्रीमती शिल्पा चाबुकस्वार | क्रीडा अधिकारी | ९९२३५९००९१ |
| ३. | श्री. अनिल सातव | क्रीडा मार्गदर्शक (कबड्डी) | ९४०५८३९४६१ |
| ४. | श्री. सुमित पाटील | क्रीडा मार्गदर्शक (फुटबॉल) | ८७९३४२४४४४ |
| ५. | श्रीमती भारती देवीकर | वरिष्ठ लिपीक | ९७५७०१४५३७ |
| ६. | श्री. सुनिल हेपट | कनिष्ठ लिपीक | ७७९५९८०३२९ |
| ७. | श्री. केशव शिंदे | सेवक | ९९६७६१८५८७ |

**जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहर**



Design & Printed by : ***U.Graphics*** Sion, 9820476105 umeshgraphics71@gmail.com